

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा. क्र. १६५६२





KITCHEN PRESS
(SEV MACHINE)
VACUUM BASE
COCONUT SCRAPER
...M BASE
...ABLE CUTTER
KITCHENWARE
AVAILABLE EVERY...

IRBK-0116562

# वीराग्रणी

(सचित्र)

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रन्थालय
वा क्र 96562 दि 3/1/106
वि.

सुरेश शर्मा

IRBK-0116562
IRBK-0116562

रम्यकथा प्रकाशन, पुणें-३०

मूल्य : २॥ रुपये

प्रकाशक :

बा. ग. मेहेंदळे,

रम्यकथा प्रकाशन,

३९२ नारायण पेठ,

कान्हेरे बिल्डिंग, पुणें-३०.

प्रथमावृत्ति : मार्च १९७६

पुनर्मुद्रणाचे सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :

बा. ग. मेहेंदळे,

जयभारत मुद्रणालय

५५१ बुधवार पेठ, पुणें २.

## स म र्प ण

पुण्याच्या कारेकर कुटुंबांतील
**चि. अजय, आशा, अनिता, कविता नि राकेश**
या
पंचपात्रांना
साशीर्वाद समर्पण

—सुरेश शर्मा

९६५६२ ३/८/-६६
क्र. ९१.

# श्रद्धांजलि

जिच्या पायांत बेड्या होत्या, हातांत कड्या होत्या, डोळ्यांत आंसवें होतीं अन् शब्दांत कारुण्य होतें, ती बंदिनी माता मंदिरांतून हांका मारीत होती !

माता हांका मारीत होती, आक्रोश करीत होती; पण तिच्या त्या हांका, तिचा तो आक्रोश ऐकायला फुरसत कुणाला होती ?

बडे बडे विद्वान्–दिग्गज विद्वान्! बडे बडे बलवान्–कलियुगी भीम !! माता बंदिनी होती; तथापि ती वंध्या नव्हती ! विद्वान्, वलवान्, कवि, कलावंत, वैज्ञानिक, दार्शनिक अशांसारख्या सुपुत्रांना तिनें जन्म दिला होता !

परंतु तें आईचें आर्त आक्रंदन ऐकण्याइतका वेळ कुणाला होता !

विद्वान अनुसंधानांत मग्न झाले होते, बलवान् आपली शक्ति अजमावण्यांत गढून गेले होते. कवि दिवास्वप्नांत गुंगले होते, कलावंत रंगमंचांत रंगले होते. वैज्ञानिकांना प्रयोगशाळा सोडीत नव्हत्या अन् दार्शनिकांना 'तत्त्वमसि' चा उलगडा होत नव्हता !

आईचा अंचल आंसवांनीं भिजून गेला होता अन् घसा हांकांनीं सुकून गेला होता.

'अरे, माझ्या मुलांनो, कुठें आहांत ?'

'अरे, माझ्या बाळांनो, काय करताहांत ?'

'अरे, या माझ्या बेड्या, या माझ्या कड्या, हें माझें वृद्धत्व तुम्हांला दिसत का नाहीं ?'

'तुम्ही माझे मुलगे ना ? मग माझा आक्रोश तुम्हांला ऐकूं का येत नाहीं ?'

पण ऐकतो आहे कोण ? फुरसत कुणाला आहे ? विद्वानांचें तत्त्वान्वेषण संपलें नव्हतें, बलवान् आखाड्यांत दंडांना पीळ देत होते ! कवींचें दिवास्वप्न भंगलें नव्हतें, कलावंतांची कल्पनासृष्टि वाढूं लागली होती. वैज्ञानिकांना प्रयोगशाळा अंतर देत नव्हत्या अन् दार्शनिकांना 'जग हें असार सारें' वाटूं लागल्यानें ते पारलौकिक विचारांत मग्न झाले होते !

अन् आई आक्रंदत होती, रडत होती, किंचाळत होती !

इतक्यांत लोकांनीं पाहिलें–कुणीतरी एक पुढें सरसावला !

कुणीतरी पुढें चालूं लागला; पागलासारखी आकृति; पण भोळीभाबडी मूर्ति ! डोळ्यांत प्रमादाची छाया; पण पायांच्या चालींत निग्रही दृढता !

तो चालला, निघाला, गेला !

० ० ० ०

तो चालूं लागतांच कुणीतरी म्हटलें, 'पागल !' कुणीतरी म्हटलें, 'दिवाणा !'

'अरे, हा साहसी दिसतो, हा अविचारी दिसतो ! जिथें बिजलीची बत्तीहि विझून जाते, तिथें हा निरांजनाचा नंदादीप तेवत ठेवूं पहातो आहे !'

'थांब, आगींत उडी टाकूं नकोस ! तूं मनुष्य आहेस, पतंग बनूं नकोस !'

हे शब्द ऐकतांच तो हंसला; पण न थांबतां पुढें चालूं लागला.

‘ नाथ, कुठें चाललां मला सोडून ?’

‘ भाई, कुठें जातोस आम्हांला टाकून ?’

‘ बाळा, तुझ्यासाठीं मीं केवढी तपस्या केली होती, मला निपुत्रिका कां ठरवतोस ?’

‘ मित्रा, जरा आमच्याकडे नजर दे ना !’

आतां त्याच्या चेहेऱ्यावर हास्याच्या जागीं कारुण्याची छटा दिसूं लागली होती.

दंभी जगतानें त्याला लालचावलें !

दंभी जगतानें त्याला धमकावलें !!

दंभी जगतानें त्याला भेडसावलें !!!

दुनिया किंचाळूं लागली, ‘ अरेरे !’

निसर्ग आक्रंदूं लागला, ‘ अरेरे !’

हवा कंपायमान झाली, जमीन कंपायमान झाली, हृदयहि कंपायमान झालें !

परंतु तो पुढें चालूं लागला. समचरण दृढगति, हृदयांत उल्हास, चेहेऱ्यावर असीम आनंद !

‘ नाथ ! ...’

‘ आई ! ......’

‘ बाळा ! ......’

‘ मित्रा ! ......’

कानांत कसले शब्द घुमत आहेत हे ? तो क्षणभर चकित होऊन उभा राहिला.

पण पुन्हां त्याला शब्द ऐकूं आले, ‘ अरे माझ्या मुलांनो,

या माझ्या बेड्या......'

'आलों, आई, आलों !' तो ओरडला नि पुढें निघाला. समोर बंदुकांच्या गोळ्या, त्यानें छाती उघडी केली. समोर फांसाच्या फळ्या, तो उत्साहानें वर चढला !

रक्ताचे कांहीं बिंदु जमिनीवर पडले होते !

एक अमोलिक प्राण निघून गेला !

खालीं दुनिया रडत होती, वर तराणा गायिला जात होता ! खालीं स्वकीय–परिजनांचे उसासे चालू होते, वर अप्सरा-किन्नरींचें नृत्य चालू होतें ! खालीं आप्तांच्या आक्रोशाचा कल-कलाट, वर परींच्या पंखांचा फडफडाट !

आईनें पाहिलें, तिच्या पायांतील शृंखलेची एक कडी तुटली होती !

० ० ० ०

अशा या वीराग्रणींच्या तिरड्या फुलांनीं सजविल्या गेल्या पाहिजेत !

'आमच्या प्रेतांची तरी नीट व्यवस्था लावा !' असें सांगून आजपर्यंत कुणी बलिदान केलें नाहीं ! प्राय: जिथें त्यांचा कुणीच नव्हता, अशाच जागीं त्यांचें प्राणार्पण झालें आहे !

त्यांचें दहन कोणी केलें होतें ?

त्यांचें दफन कोणी केलें होतें ?

त्यांना कफन कोणी दिलें होतें ?

सत्तावन सालांतील स्वातंत्र्यसंग्रामापासून आजतागायत आमच्या देशांत ही परंपरा अशीच चालू आहे !

ज्या आझाद हिंद सैनिकांनीं शोनानपासून मणिपूरपर्यंत आपल्या शोणिताचें सिंचन केलें, त्यांच्या चिता कुठें कुठें आहेत ?

बचाळीसच्या बंडांत ज्या वीरांनीं देशाच्या कानाकोपऱ्यांतून आपल्या हौतात्म्याचा धूप घुमविला, त्यांचा ठावठिकाणा अगर नांवनिशाणी तरी आज दिसते आहे काय ?

त्यावेळीं आम्ही युद्धांत गुंतलों असल्यानें या गोष्टीचा विचार करण्यास आम्हांला सवड नव्हती.

अन् आज आम्ही स्वतंत्र झालों असलों, तरी पुनर्घटनांच्या निर्मितीपुढें आम्हांला मागें पहाण्यास सवड नाहीं.

जित्यांसंबंधींचे विचारणीय विषय आज आमच्यापुढें इतके आहेत कीं, त्यापुढें मुडद्यांसंबंधींचा विचार करण्यास आम्हांला अवसरच नाहीं !

अरेरे वीरांनो ! हाय हाय हुतात्म्यांनो ! !

० ० ० ०

आपल्या या भारतांत स्वातंत्र्यदिन साजरा करण्याच्या निमित्तानें ठिकठिकाणीं असंख्य मिरवणुका निघत असतात, असंख्य झुंडी लोटत असतात; पण ज्यांनीं आपल्या हौतात्म्याद्वारें आम्हांला विजय प्राप्त करून दिला, ज्यांनीं आपल्या बलिदानामुळें आम्हांला स्वातंत्र्याचें सोनें मिळवून दिलें, त्या वीरांच्या बलिस्थानांवर गेलेली एकहि मिरवणूक दिसत नाहीं कधीं !

ते हुतात्मे कोण होते, त्यांचीं बलिस्थानें कुठें कुठें आहेत, त्यांचा तपास लावण्याचा कुणीतरी प्रयत्न केला आहे काय ?

आत्मवंचना ! विश्वप्रपंच ! !

पण असें बोलूं नका ! प्रायः सत्याचा सविता मेघांनीं व्यापला गेला, तरी सूर्य तो सूर्य, ढग ते ढग !

हौतात्म्य सत्य आहे ! त्याच्याभोंवतीं जरी विस्मृतीचें धूम्रवलय पसरलें असलें, तरी धुरकट कांचेच्या कंदिलांतील दीप-

शिखेप्रमाणें तें अधिकच सुंदर दिसतें ! !

देवस्थानांत घरोघरच्या पेटत्या पणत्या आल्यावर त्यांच्यांतील भिन्नत्व नष्ट होऊन सुंदर दीपमालेंत त्या एकरूप होतात !

तुम्ही हुतात्म्यांचें नांव विसरा, गांव विसरा, त्यांचें बलिदानहि विसरा हवें तर; पण त्यांचें हौतात्म्य विसरूं नका ! नव्हे, तें तुम्हांला विसरतां येणार नाहीं !

ज्या ज्या वेळीं या वीराग्रणींविषयीं चर्चा होईल, त्या त्या वेळीं आमच्या हृदयांतून उच्छ्वास बाहेर पडले पाहिजेत !

ज्या ज्या वेळीं हुतात्म्यांसंबंधींच्या गोष्टी निघतील, त्या त्या वेळीं आमचीं मस्तकें विनत झालीं पाहिजेत !

रक्तापासून बनलेले आम्ही प्राणी, रक्ताचें दान विसरत नसतों !

या रुधिरदानानें जे अमर झाले, ते त्रिवार धन्य होत !

जिथें अमरांचा अधिवास असतो, तिथेंच आतां त्यांचें वास्तव्य !

जिथें जरा नाहीं, जडता नाहीं, उन्हाळा नाहीं, हिंवाळा नाहीं, तिथेंच त्यांचें आतां वास्तव्य !

जिथें सदोदित वसंत आहे, जिथें अक्षय्य स्वास्थ्य आहे, तिथेंच त्यांचें आतां वास्तव्य !

जिथें निर्धूम चैतन्य आहे, जिथें शाश्वत यौवन आहे, तिथेंच त्यांचें आतां वास्तव्य !

जिथें क्षुद्रता नाहीं, जिथें विस्मृति नाहीं, तिथेंच त्यांचें आतां वास्तव्य !

ते भूतलावर आले होते; पण अमरांचे वंशज म्हणून आले होते !

अन् म्हणूनच येथील पाप–ताप त्यांना बाधक झाले नाहींत. संधि सांपडतांच आम्हांला जळत पोळत ठेवून ते इथून निघून गेले !

त्यांची स्मृति हीच चिता आहे ! ती चिता मानवी मनांत सारखी धडाडत राहिली पाहिजे अन् तिथवर मिरवणुका गेल्या पाहिजेत आणि––

ज्यांत मातांचे उसासे असतील,
ज्यांत भगिनींचे कोमेजलेले चेहरे असतील,
ज्यांत मित्रांचीं मेलेलीं मनें असतील,
अन् ज्यांत स्वजन–परिजनांच्या हातीं श्रद्धा–सुमनांच्या माला असतील,
अशाच स्वरूपाच्या त्या मिरवणुका असल्या पाहिजेत !

सुरेश शर्मा

# वीराग्रणी

## १. कॅप्टन चंद्रनारायण सिंह

गोष्ट फार जुनी आहे. आईनें सांगितली होती मला. त्यानंतर मीं ती पुस्तकांतहि वाचली होती. तुम्हांलाहि ती कदाचित ठाऊक असेल.

एका गाढवाला वाघाचें कातडें मिळतांक्षणीं तो बेफिकीर बनला अन् लोकांच्या शेतांची नासधूस करूं लागला; पण अखेर गाढव तो गाढवच! वाघाचें कातडें पांघरल्यावर वाघ होतो थोडाच! शेवटीं त्याचा गाढवपणा उघडकीस आला अन् त्याला शेतकऱ्याकडून मार खावा लागला!

पण ही गोष्ट नवीन आहे. मी सांगतों ती तुम्हांला.

१९६५ च्या ऑगस्ट महिन्यांतील एक दिवस. संध्याकाळचा सुमार. उडी-पुंछ भागांतील युद्धविराम रेषेच्या पलीकडील एका चौकींत भारतीय सैनिक अन् अधिकारी आपापसांत बोलत बसले होते; पण तितक्यांत एक खेडवळ इसम आपल्या चौकीकडे धांवत येत आहे असें त्यांनीं पाहिलें.

तो धांवत येणारा खेडवळ इसम चौकींतल्या माणसांच्या ओळखीचा होता. जवळच्या डबरोट या गांवांतला धनगर होता तो अन् त्याचें नांव मोहम्मददीन असें होतें. तो धांवत आल्यामुळें त्याला दम लागला होता. धापा टाकतां टाकतां सादे लिबासमध्यें मशीनवर काम करणाऱ्या कित्येक लोकांना आपण पाहिल्याचें त्यानें चौकींतल्या सैनिकांना सांगितलें होतें. मशीनवर काम करणारे ते लोक कदाचित पाकिस्तानी असावेत अन् मशीनच्याद्वारें ते पाकिस्तानांत कोणतातरी संदेश पाठवीत असावेत असा संशय त्यानें बोलतांना व्यक्त केला होता.

भारतीय सैनिकांना तसा संशय पूर्वींपासूनच येत होता; पण त्या खेडवळ माणसाच्या सांगण्यावरून त्या सैनिकांची तशी पक्की खात्री झाली.

ती बातमी लगेच हेडक्वार्टरला कळविण्यांत आली. कमांडिंग ऑफिसरनें ताबडतोब हाताखालच्या अधिकाऱ्यांना बोलावलें अन् पुढील हालचालीबद्दल त्यांच्याशीं विचारविनिमय केला. थोड्याच वेळांत त्यांनीं कॅप्टन चंद्रनारायण सिंहा यांना तपासासाठीं पाठविण्याचा निर्णय घेतला. त्या धनगरानें सांगितलेली हकीकत जर खरी असेल, तर तपास लगेच लागेल असें हेड क्वार्टरमधल्या अधिकाऱ्यांना वाटलें होतें नि त्यामुळेंच त्यांनीं तसा निर्णय घेतला होता.

साऱ्या अधिकाऱ्यांचें एकमत होतांच कॅप्टन चंद्रनारायण सिंह अन् त्यांच्या हाताखालचे सैनिक हे पुढच्या कामगिरीसाठीं तयार झाले.

कमांडिंग ऑफिसरनें नकाशा नीट समजावून घेतल्यावर तो कॅप्टन सिंहांना म्हणाला, ' मिस्टर सिंह, इथून जवळ जवळ

दोन मैलांवर वायव्य दिशेला जो पहाड आहे, तिथेंच कांहींतरी गडबड असली पाहिजे अशी आमची खात्री आहे.'

आदेश मिळतांच भारतीय सैनिकांची एक तुकडी तिकडे रवाना झाली. त्यांच्या पायांतील बुटांच्या आवाजामुळें आजूबाजूचा प्रदेश दणाणून गेला.

पावसाळ्याचे दिवस, पहाडी प्रदेश, केव्हां पाऊस पडेल त्याचा नेम नाहीं, एखादें जंगली जनावर केव्हां पुढें येईल तें सांगतां येणार नाहीं, एखादा भला मोठा साप आड येऊन त्यांची वाट अडविणेंहि संभवनीय !

लहानसहान वांकड्यातिकड्या पायवाटा, मध्यंतरींच्या लहानसहान नद्या, लहानमोठीं झाडेंपेडें यांच्यांतून जाणारी सैनिकांची ती तुकडी उतारावर आली न आली, तोंच अचानक गोळीबाराला सुरुवात झाली. दोन-तीन गोळे त्या तुकडीच्या नजीक येऊन फुटले. मशीनगनमधून गोळ्या सुटत होत्या अन् मॉर्टरमधून गोळे सुटत होते.

'सावधान !' कॅप्टन सिंहांनीं सैनिकांना सांगितलें, 'हाल्ट !'

बुटांचा खाड् असा आवाज झाला अन् सारे सैनिक जागच्या जागींच थांबले.

कॅप्टन सिंह हलक्या आवाजांत त्यांना म्हणाले, 'आमचा अंदाज बरोबर होता. या टेकडीच्या पलीकडेच शत्रूचे सैनिक आहेत. चढाई सरळ आहे अन् शत्रु उंचावर आहे. आपण इथूनच पांगापांग करायची अन् मोर्चा सांभाळायचा !'

कॅप्टन सिहांनीं सैनिकांच्या दोन तुकड्या केल्या. त्यांतली एक तुकडी डाव्या बाजूला अन् दुसरी तुकडी उजव्या बाजूला

रवाना केली. आपले सैनिक शत्रूकडील माऱ्याच्या टप्प्यापासून दुर गेले आहेत अशी जेव्हां त्यांची पक्की खात्री झाली, तेव्हां त्यांनीं आपल्या सैनिकांना ऑर्डर दिली, 'चार्ज !'

भारतीय सैनिकांच्या रायफली सिंहासारख्या गर्जना करूं लागल्या. शत्रुसैनिकहि त्यांना उत्तरें देऊं लागले. दोन्हीकडून गोळीबार चालूं झाला; तथापि त्यांतून कांहींच निष्पन्न झालें नाहीं.

थोडयाच वेळांत गोळीबार थांबविण्यांत आला.

मध्यरात्रीच्या दरम्यान शत्रुसैनिक झोंपल्यावर पुन्हां गोळीबार चालूं करायचा असा निर्णय घेण्यांत आला.

कांहीं तास चोहोंकडे शांत होतें. दोन्ही पक्षांची हालचाल पूर्णपणें थांबली होती. तेवढ्या अवधींत शत्रूला नामशेष कसें करावें त्याबद्दलची योजना कॅप्टन सिंह आपल्या मनांत आंखीत होते.

शत्रुसैनिकांकडे मॉर्टर्स अन् मशिनगन्स आहेत, ते टेकडी-पलीकडे लपून बसले आहेत अन् पाकिस्तानी घुसखोरांना काश्मिरांत घुसवन आमच्या शांततेचा भंग करीत आहेत असा कॅप्टन सिंहांनीं जो अंदाज केला होता, तो चुकीचा नव्हता !

मध्यरात्रीनंतर भारतीय सैनिकांची तुकडी टेकडीच्या दिशेनें सरकली. पुढें कॅप्टन सिंह होते अन् त्यांच्या मागें मूठभर सैनिक होते.

कॅप्टन सिंहांनीं सोबतच्या सैनिकांना समजावून सांगितलें कीं, 'शत्रूचे सैनिक आमच्याहून संख्येनें जास्त आहेत, त्यामुळें त्यांना आपली चाहूल लागूं न देतां आपण पुढें चालत गेलें पाहिजे. जर ते मध्येंच जागे झाले तर आमची सारी मेहनत फुकट जाईल.'

रात्रीची नीरव शांतता होती. जरा कुठें खुट्ट झालें, तरी तो आवाज चोहोंकडे दूरवर फैलावत असे. भारतीय सैनिक दबत्या पावलांनीं पुढें चालत होते; तथापि त्यांच्या बुटांचा आवाज शत्रु-सैनिकांच्या कानीं पडतांच ते सावध झाले अन् त्यांनीं गोळीबारास सुरवात केली !

भारतीय सैनिक अन् शत्रुसैनिक यांच्यांत सुमारें पन्नास यार्डांचेंच अंतर होतें. आतां लपून रहाण्यांत अर्थ नाहीं असें भारतीय सैनिकांना वाटल्यानें त्यांनीं त्यांना सामोरें जाण्याचें ठरविलें.

'फायर !' कॅप्टन सिंहांनीं आपल्या सैनिकांना आदेश दिला.

आदेश मिळतांच भारतीय सैनिकांकडून गोळ्यांचा वर्षाव होऊं लागला.



शत्रुसैनिकांनीं मॉर्टर्सद्वारें त्याला उत्तर दिलें.

'पुढें चला,' कॅप्टन सिंहांनीं आपल्या सैनिकांना हुकूम दिला, 'थांबू नका, चार्ज !'

भारतीय सैनिक नि शत्रुसैनिक यांच्यांतील अंतर आस्ते आस्ते कमी कमी होत चाललें. चाळीस, तीस, वीस, अन् आतां दहा फुटांच्या अंतरांत मुकाबला चालू होता. चोरून आलेल्या पाकिस्तानी सैनिकांपैकीं कांहीं ठार झाले होते अन् कांहीं पळून गेले होते. भारतीय सैनिकांनीं त्यांना कापसासारखें पिंजून काढलें होतें; तथापि त्यांच्यांतला एक सैनिक आपली मशीनगन सांवरीत जागच्या जागींच उभा होता.

कॅप्टन सिंह ललकारले अन् त्यांनीं गोळीबार चालू केला.

पण मॉर्टर्स आणि मशिनगन्स यांच्या गोळीबारांत फरक असतो.

शत्रुसैनिकाच्या मशिनगनमधून सुटलेल्या गोळ्या कॅप्टन सिंहांच्या छातींत घुसल्या.

कॅप्टन सिंहांनीं खालीं कोसळतां कोसळतां आपल्या सैनिकांना आदेश दिला, ‘पुढें चला !’

आपला अधिकारी खालीं कोसळून पडल्याचें त्या सैनिकांनीं पाहिलें; पण त्यामुळें त्यांचा धीर खचला तर नाहींच, उलट त्यांना जास्त चेव चढला. मशिनगन चालविणारा शत्रुसैनिक पळून जाऊं लागल्याचें पहातांच त्यांनीं त्याला गोळ्या घालून ठार केलें.

कॅप्टन सिंह आतां हुतात्मे बनले होते. त्यांना वीरोचित मरण आलें होतें. त्यांच्या प्रेताकडे पाहून सारे सैनिक अश्रु ढाळूं लागले; पण त्याचवेळीं त्यांनीं मनांत प्रतिज्ञा केली कीं, आम्ही याचा बदला घेऊं तेव्हांच विश्रांति घेऊं !

त्यानंतर ते शत्रुसैनिकांच्या तळाकडे गेले. तिथें त्यांना बरींचशीं प्रेतें, बरींचशीं शस्त्रें अन् बराचसा दारूगोळा हीं दिसलीं. त्याशिवाय तिथें दुसरें आणखी कांहींच नव्हतें !

कॅप्टन सिंहांचें शव घेऊन आठ सैनिक मागें परतले. त्यांना दुसरा मोर्चा सांभाळायचा होता.

✦ ✦

# २. मेजर रणजीतसिंह दयाळ

'अखेर हे घुसखोर येताहेत तरी कुठून ?' एका भारतीय सैनिकानें दुसऱ्या भारतीय सैनिकाला विचारलें.

'पाकिस्तानांतून !' दुसरा सैनिक लगेच म्हणाला, 'म्हणजे हेंहि ठाऊक नाहीं तुला ?'

'तूं मूर्ख आहेस !' पहिला सैनिक चिडून त्याला म्हणाला, 'तें आंधळासुद्धां सांगेल. माझ्या विचारण्याचा आशय असा कीं, ते कुठल्या बाजूनें नि कुठल्या रस्त्यानें येताहेत ?'

'तें मलाहि माहीत नाहीं. मला माहीत असतें, तर मी त्यांना एक पाऊलहि पुढें टाकूं दिलें नसतें. त्यांचे राईराई एवढे तुकडे केले असते ! तूं काय समजलास ?'

पहिला सैनिक जरासा गंभीर दिसत होता. तो रजेवर गेला होता अन् आजच परत आला होता. दुसऱ्या सैनिकानें भलत्याच वेळीं केलेली थट्टा त्याला आवडली नाहीं. पाकिस्तानी घुसखोर काश्मीरांत शिरले होते अन् त्यांना परत हुसकावून लावण्याचें

काम दिवसेंदिवस वाढत चाललें होतें काश्मीरांत कित्येक ठिकाणीं जाळपोळ अन् लुटालूट हे प्रकारहि घडले होते.

पहिला सैनिक चिंतातुर झाल्याचें पाहिल्यावर दुसरा सैनिक त्याला म्हणाला, 'काडीमात्र काळजी करूं नकोस गड्या! पाकिस्तानी घुसखोरांचें मरण जवळ आलें असल्यामुळेंच त्यांना आपलीं घरेंदारें नि बायकापोरें सोडून इकडे येण्याची दुर्बुद्धि आठवली आहे. साऱ्या घुसखोरांना पिटून काढलें जाणार! कसें तें तूं पहा अन् मीहि पहातों. आपल्या अधिकाऱ्यांची आज मीटिंग चालू आहे. तिच्यांत ते घुसखोर कुठून नि कसे येतात त्याबद्दलची चर्चा केली जाणार. इतकेंच नव्हे, तर ते ज्या मार्गानें इथें येतात, तो मार्गहि बंद करण्याचा उपाय आंखला जाणार. आम्ही फक्त लढायचें!'

'तुझें म्हणणें खरें आहे. लढलेंच पाहिजे आम्हांला!' पहिला सैनिक म्हणाला, 'देशांतील शांततेचा भंग होऊं नये म्हणून आम्हांला लढलेंच पाहिजे. आपल्या देशाच्या सीमांचें संरक्षण आपण केलेंच पाहिजे.' असें म्हणून तो तिथून निघून गेला.

त्या दिवशीं कदाचित ऑगस्टची सव्वीस तारीख असावी असें वाटतें. मुसळधार पाऊस पडला होता; त्यामुळें चिखल इतका झाला होता कीं, पाऊल पुढें टाकलें कीं तें त्या चिखलांत घट्ट रुतून बसे! पहाडी प्रदेशांतील नद्यानाल्यांना पूर आला होता. असें असलें, तरी आकाश मात्र निरभ्र होतें.

कमांडिंग ऑफिसरनें मीटिंगला सुरवात केली. त्याच्यासोबत जबाबदार सैनिकी अधिकारी बसले होते.

कमांडिंग ऑफिसर त्यांना म्हणाला, 'आजच्या वृत्तपत्रांत पाकिस्तानी घुसखोरांचे फोटो नि त्यांच्यासंबंधींची माहिती आपण

वाचली आहांत. त्यांचा सारा इतिहास माझ्या रेकॉर्डीत आहे.'

सारे सैनिकी अधिकारी कमांडिंग ऑफिसरचें बोलणें लक्ष लावून ऐकत होते.

कमांडिंग ऑफिसर म्हणाला, 'त्या लोकांची चौकशी केली, तेव्हां मला कळलें कीं, त्यांना या कामासाठीं बऱ्याच दिवसांपूर्वी शिक्षण देऊन तयार करण्यांत आलें आहे. चिनी सैनिकांची एक तुकडी त्यांना शिकवीत असते. ते चिनी सैनिक कोरिया युद्धांतले अनुभवी असून गनिमी युद्धांतहि ते निष्णात असल्याचें समजतें. पाकिस्तानी राज्यकर्ते या लोकांना चोरवाटांनीं इकडे पाठवून शांततेचा भंग करूं पहाताहेत. हे घुसखोर हाजीपीर खिडींतून भारतांत शिरत असल्याचें मला कळलें आहे. त्या घुसखोरांना इथून परत घालवून देणें अन् हाजीपीर खिडीचा रस्ता रोखून धरणें अशीं दोन कामें आम्हांला पार पाडायचीं आहेत.'

कमांडिंग ऑफिसर थांबला अन् त्यानें आपल्या सहकाऱ्यांकडे पाहिलें. कदाचित त्याला त्यांचें मत अजमावयाचें असेल.

मेजर रणजीतसिंह दयाळ आपल्या खुर्चीवरून उठले अन् म्हणाले, 'आपली आज्ञा असल्यास मला थोडेंसें बोलायचें आहे.'

'अवश्य, अवश्य.' कमांडिंग ऑफिसर म्हणाला, 'मेजर दयाळ, आपण जरूर बोला काय कामाचें बोलणार असाल तें.'

'सर अन् साथींनो,' मेजर दयाळनीं बोलायला सुरवात केली, 'पाकिस्तानचे हे चवचाल चाळे आपण बंद पाडले पाहिजेत. जर मला हुकूम मिळत असेल, तर मी हाजीपीरला जातों अन् तिथें कबजा करून घुसखोरांचा रस्ता अडवून धरतों.'

'मेजर दयाळ,' कमांडिंग ऑफिसर म्हणाला, 'तुमचें म्हणणें रास्त आहे; पण त्याला जनरलची अनुमति पाहिजे. मी

आत्तांच त्यांच्याशीं फोनवरून बोलतों.'

मीटिंग बरखास्त झाल्यावर कमांडिंग ऑफिसरनें दिल्लीला फोन केला. मेजर दयाळचा प्रस्ताव जनरलला सांगितला. त्यानें त्या प्रस्तावाला मान्यता दिली.

संध्याकाळच्या सुमारास मेजर रणजीत दयाळ यांच्या नेतृत्वाखालीं भारतीय सैनिकांची एक तुकडी हाजीपीरला रवाना झाली. त्या सैनिकांकडे रायफल्स अन् छोटयाशा मशिनगन्स एवढींच हत्यारें होतीं. हाजीपीर खिंड काबीज करण्यापूर्वीं त्यांना सांख, सार अन् लेडवाली गली अशा तीन चौक्या जिंकायच्या होत्या !

त्या पहाडी प्रदेशांतला अडचणींचा रस्ता ओलांडल्यावर तो काफिला पहांटेला तीन वाजतां सांख चौकीपाशीं जाऊन पोहोंचला. त्या सैनिकांनीं तिथें मोर्चेबंदी केली अन् मोठ्या सावधगिरीनें शत्रुपक्षाला ललकारिलें.

पण शत्रुपक्षानें विचारच केला नाहीं. त्यानें लगेच गोळीबार चालू केला. दाट काळोखामुळें भारतीय सैनिक चौकीकडे कुठल्या बाजूनें येताहेत तें शत्रुपक्षाला कळलेंच नाहीं.

तथापि शत्रुपक्षाची ती अनभिज्ञता भारतीय सैनिकांना मदतगार ठरली अन् शत्रूच्या गोळीबाराला न जुमानतां ते पुढें पुढें जाऊं लागले. जवळ जवळ पन्नास यार्ड चालून गेल्यावर मेजर दयाळ यांनीं सैनिकांना आदेश दिला, 'चार्ज ! चार्ज ! चार्ज !'

भारतीय सैनिकांच्या गोळीबारामुळें तो पहाडी प्रदेश दणाणून गेला अन् एक तासानंतर सांख चौकीवर भारताचा ध्वज फडकला !

ती विजयाची बातमी वायरलेसवरून कमांडिंग ऑफिसरला देतांना मेजर दयाळनीं सांगितलें, 'सर, आम्ही सांख चौकी आमच्या ताब्यांत घेतली आहे. शत्रूचे पन्नास सैनिक ठार झाले असून त्याचे शेंकडों सैनिक रायफली टाकून पळून गेले आहेत. बरींचशीं हत्यारें अन् बराचसा दारूगोळा हीं आमच्या ताब्यांत आलीं असून पंचवीस सैनिकांना आम्ही कैद केलें आहे.'

'हार्दिक अभिनंदन! मिस्टर दयाळ, पुढें चला! सैनिकांची एक तुकडी मी दुसऱ्या रस्त्यानें हाजीपीरकडे पाठवून देत आहें.'

'ओ. के. सर!' मेजर दयाळांनीं सांगितलें नि ते आपल्या सैनिकांसह पुढचा रस्ता चालूं लागले.

सकाळीं नऊ वाजेपर्यंत सारे सैनिक एकत्र होते; पण दुसरी चौकी एक मैल पुढें असतांना मेजर दयाळांनीं आपल्या सैनिकांच्या दोन तुकड्या करून एक तुकडी डावीकडे अन् दुसरी उजवीकडे पाठविली नि चौकीवर मागच्या बाजूनें हल्ला करण्याची सूचना दिली.

थोड्याच वेळांत ती चौकी चोहोंकडून वेढली गेली. आंतील शत्रुसैनिकांनीं हातपाय हलविण्याचा प्रयत्न केला; पण त्यांच्याकडील मॉर्टर्स, मशिनगन्स नि रायफल्स यांच्या गर्जना होऊनहि गोळ्यांचा वर्षाव झाला नाहीं! विशेषसा रक्तपात न होतां सार चौकीवर भारताचा राष्ट्रध्वज फडकला! त्यावेळीं सकाळचे नऊ वाजले होते. पंधरा मिनिटेंसुद्धां लढाई चालली नाहीं. शत्रुपक्षाचे तीन सैनिक मरतांच बाकीचे सैनिक घाबरले अन् दिसेल त्या वाटेनें पळून गेले. तेरा सैनिकांना कैद करण्यांत आलें!

मेजर दयाळांनीं ती विजयाची बातमी वायरलेसवरुन

कमांडिग ऑफिसरला कळविली अन् ते आपल्या सैनिकांसह पुढचा रस्ता चालूं लागले.

लेडवाली गली तिथून फारशी दूर नव्हती. केवळ सहासात मैलांचाच मामला होता. मेजर दयाळांनीं तेवढें अंतर फक्त दोनच तासांत तोडलें अन् ते लेडवाली गलींत जाऊन पोहोंचले. तिथें पोहोंचतांच हल्ल्याला सुरवात केली. फक्त अर्धा तास लढाई झाली; तथापि शत्रूचा कांटा काढण्यांत भारतीय सैनिकांना यश मिळालें. दुपारीं अकरा वाजतां लेडवाली गलीवर भारतीय सैनिकांनीं कबजा केला.

आतां हाजीपीर खिंड हा अखेरचा पल्ला गांठायचा होता. ती खिंड तिथून दूर होती अन् तिथें शत्रुसैनिकहि जास्तच होते. मेजर दयाळांना ती गोष्ट ठाऊक होती; तथापि त्यांचा स्वतःवर अन् स्वतःच्या सैनिकांवर पूर्ण भरंवसा होता. तीन चौक्या त्यांनीं सर केल्या होत्या; पण स्वतःचा एकहि सैनिक गमाविला नव्हता.

अन् त्याच विश्वासावर ते रणमर्द सैनिक हाजीपीर खिंडीकडे रवाना झाले होते! संध्याकाळीं सात वाजतां हाजीपीर खिंडीच्या अलीकडे मेजर दयाळांनीं तळ ठोकला. तळ ठोकतांच पहिल्या प्रथम त्यांनीं वायरलेसनें हेड क्वार्टरशीं संपर्क साधला अन् कमांडिग ऑफिसरला तिथली परिस्थिति कळविली. इतकेंच नव्हे, तर आपण रात्रीं दहा वाजतां हाजीपीरवर हल्ला करणार आहों असेंहि त्यांनीं कमांडिग ऑफिसरला कळविलें.

त्यावर कमांडिग ऑफिसरनें त्यांना सांगितलें, 'माझ्या दृष्टीनें तसें करणें अनुचित ठरेल. आमचे सैनिक दोन रात्री झोंपलेले नाहींत. त्यांनीं तीन चौक्या हस्तगत केल्या आहेत. माझें मत असें आहे कीं, डीनरनंतर तुम्ही सर्वांनींच स्वस्थ झोंपावें.'

'पण सर, जोंपर्यंत आम्ही हाजीपीर खिड जिंकली नाहीं, तोंपर्यंत आम्हांला झोंप कशी पडेल ?' मेजर दयाळ म्हणाले.

'मिस्टर दयाळ, तुम्ही म्हणतां तें तुमच्या दृष्टीनें खरें आहे; तथापि हाजीपीर खिडींत शत्रूचे सैनिक आमच्या सैनिकांहून जास्त आहेत. आत्तांच कर्नल संपूर्णसिंहांनीं आपले सैनिक पहांटे पांच वाजतां हाजीपीरला पोहोंचतील असें मला कळविलें आहे. तसें झालें तर त्यांची तुम्हांला आयतीच जास्त मदत मिळेल.'

'ठीक आहे साहेब, उद्यां पहाटे पांचला !' मेजर दयाळांनीं कमांडिंग ऑफिसरला सांगितलें.



रात्रीं साऱ्या सैनिकांचें सायंभोजन झालें. सायंभोजनाच्यावेळीं मेजर दयाळ सैनिकांना म्हणाले, 'हाजीपीरवर हल्ला करतांना आपण एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ज्या खिडींतून आमचा शत्रु घुसखोरांना आमच्या देशांत पाठवीत आहे, ती हाजीपीर खिड ही केवळ एक खिड आहे असें समजूं नका. तिथें

मुसलमानांचा दर्गा आहे अन् तें हिंदूंचेंहि पवित्र स्थान आहे. अर्थात् त्या स्थानाचा अपमान न होईल अशी आपण दक्षता घेतली पाहिजे. जर त्या स्थानाचा आमच्याकडून अपमान झाला, तर ती गोष्ट वाईट ठरेल. आमचें सरकार धर्मनिरपेक्ष आहे. तें साऱ्या धर्मांकडे सारख्याच दृष्टीनें पहातें, अशा स्थितींत त्या स्थानाचा आपल्याकडून अपमान झाला, तर तो आपल्या सरकारचाच अपमान झाला असें होईल.'

अशा अवस्थेंत ते सैनिक झोंपणार तरी कसे? पण त्यांनीं दोन दिवस खडतर प्रवास केला होता अन् दोन रात्री जागून काढल्या होत्या, त्यामुळें त्यांच्या पाठी जमिनीला लागतांच त्यांना झटकन झोंप लागली. पहांटे चार वाजतां सारे सैनिक जागे झाले नि ते पुढची वाट चालूं लागले.

पुढचा रस्ता झाडांझुडपांनीं अन् खांचा खळग्यांनीं भरलेला होता. हाजीपीरला पोहोंचेस्तोंवर दिवस वर आला. सकाळचे आठ वाजण्यापूर्वींच भारतीय सैनिकांनीं शत्रुसैनिकांवर निकराचा हल्ला करून त्यांची दाणादाण उडविली. दोन तासपर्यंत चाललेल्या त्या लढाईंत शत्रुपक्षाची भयंकरच हानि झाली. त्याचे जवळजवळ ऐंशी सैनिक मारले गेले, पंचेचाळीस गिरफदार केले गेले. जखमी अन् पळपुट्या सैनिकांची संख्या सांगतां येत नाहीं!

मेजर दयाळ हाजीपीर खिंडींतल्या चौकीवर राष्ट्रध्वज फडकावीत होते; पण तितक्यांत कर्नल संपूर्णसिहांची तुकडी तिथें येऊन पोहोंचली. कर्नलनीं मेजरनां शाबासकी दिली, मेजरनीं कर्नलनां धन्यवाद दिले.

'हें आहे घुशींचें बीळ!' कर्नल संपूर्णसिह म्हणाले.

‘होय’ मेजर दयाळ म्हणाले, ‘याच बिळावाटे पाकिस्तानी घुसखोर काश्मीरांत घुसत होते. आतां कुठल्या वाटेनें येतात पाहूं !’

कर्नल म्हणाले, ‘परवां अन् काल मिळून आमच्या सैनिकांनीं काश्मीरांत हजारों घुसखोर पकडले आहेत !’

त्यावर मेजर म्हणाले, ‘जोंपर्यंत काश्मीरी जनता आमच्या पाठीशीं आहे, तोंपर्यंत या घुसखोरांची इथें मात्रा चालणार नाहीं !’

✦ ✦

# ३. सुभेदार मनबहादुर

भारतांत बहादुर एक– लालबहादुर शास्त्री !

अन् त्या सैनिकांच्या तुकडींत तर सारेच बहादुर होते.

केवळ कामानेंच नव्हे, तर नामानेंहि बहादुर होते ! कोण होता मनबहादुर, कोण होता रणबहादुर तर कोण होता जंगबहादुर !

ते लोक संख्येनें थोडे असले, तरी अखेर ते बहादुर होते.

बहादुर एकटा असला, तरी तो शत्रूला भारी पडतो !

ती गुरखा रेजिमेंटची एक लहानशी तुकडी होती अन् तिचें नेतृत्व पत्करलें होतें सुभेदार मनबहादुर यांनीं.

त्यांच्यावर टिटवालच्या संरक्षणाची जबाबदारी सोंपविली होती.

पाकिस्तान्यांचे नापाक हेतु धुळीला मिळाल्यामुळें ते फारच चिडले होते.

सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यांतली ही घटना.

पाकिस्तान्यांनीं जिकडे तिकडे हवाई हल्ले चालू केले होते.

हाजीपीर खिंड त्यांच्या हातांतून गेल्यामुळें त्यांना फार वाईट वाटलें होतें, म्हणून त्या स्थानाचा बदला आपण दुसऱ्या कोणत्या-तरी स्थानावर घ्यावा असें त्यांनीं ठरविलें होतें.

टिटवाल भागांत एक स्थान आहे. त्याचें नांव संजोई असें आहे.

त्या संजोईचे पुन्हां दोन भाग केले आहेत. त्यांपैकीं एकाचें नांव आहे अपर संजोई अन् दुसऱ्याचें नांव आहे लोअर संजोई.

पाकिस्ताननें टिटवाल भागावर आक्रमण करण्याची फार मोठी योजना आंखली आहे असें भारतीय सेनेच्या हेडक्वार्टर्सला गुप्त रीतीनें कळलें होतें. पाकिस्तानी मेजर मुहम्मद अय्यूब हे त्या आक्रमणाच्या पूर्वपहाणीसाठीं टिटवाल भागांत हिंडत फिरत होते. त्यांच्यासोबत साध्या वेषांतील सैनिक होते अन् भारताची संचाररेषा कशी तोडतां येईल त्यासंबंधीं ते विचार करीत होते.

त्यासाठीं पाकिस्तानी ब्रिग्रेडियर रहीम खिलजी यानें संजोई येथें आपलें हेडक्वार्टर बनवून मोर्चेबंदी केली होती. त्यानें संजो-ईच्या दोन्ही भागांत ठिकठिकाणीं सुरुंग पेरले होते, कांटेरी तारांचीं कुंपणें केलीं होतीं अन् बंकर्सहि तयार केले होते.

गुरखा रेजिमेंटची एक लहानशी तुकडी अन् पाकिस्तानची भलीमोठी ब्रिगेड! मुकाबला मोठाच असला, तरी भारतीय सेनेच्या कमांडिंग ऑफिसरला गुरखा सैनिकांच्या बहादुरीविषयीं विश्वास वाटत होता, त्यामुळें त्यानें सुभेदार मनबहादुरशीं वायर-लेसनें संपर्क साधला.

'हॅलो मनबहादुर! मी कमांडिंग ऑफिसर बोलतों आहें.'

'यस् सर.' मनबहादुरचा आवाज.

'संजोई तुमच्यापासून किती दूर आहे?'

'जास्त लांब नाहीं सर.'

'तिथें शत्रूची एक ब्रिगेड आहे. तुम्ही तिच्यावर हल्ला करायला तयार आहांत का ?'

'यस् सर.'

'पण तुमच्यापाशीं सैनिक फारच थोडे असतील ?'

'कांहीं हरकत नाहीं सर! गुरखे कमी असले तरीहि ते जास्त असतात.'

'शाबास!' कमांडिंग ऑफिसरनें आदेश दिला, 'तुम्ही आजच हल्ला करा. मागाहून मी मदतीला माणसें पाठवीत आहें. हं, जरा हिम्मत धरा बरें.'

'आपण बेफिकिर रहा साहेब, हें केवळ कांहीं तासांचेंच काम आहे. आम्ही आपल्या आज्ञेची वाट पहात होतों. आतां काम झालेंच म्हणून समजा!'

त्यावेळीं काळोख पडला होता. तयारी करायला एक तास लागला. बरोबर मध्यरात्रीं गुरखा रेजिमेंटच्या एका लहानशा तुकडीनें शत्रुसैन्यावर हल्ला चढविला.

पण शत्रुसैनिक चौपट होते. चोहोंबाजूंनीं मशिनगन्स् अन् रायफल्स यांच्यांतून गोळ्यांचा वर्षाव सुरू झाला. त्यांच्या आवाजानें कानठळ्या बसून गेल्या. त्यानंतर थोड्याच वेळानें कुठून कुणास ठाऊक; रॉकेटस् आलीं अन् तीं गुरखा सैनिकांपाशीं येऊन फुटलीं.

लगेच सुभेदार मनबहादुरनें गर्जना केली, 'राकेट फेंका, चार्ज!'

गुरखा सैनिकांनीं भराभर रॉकेटस् फेकायला सुरवात केली.

ती शत्रुसैनिकांच्या कपाळांवर आदळतांच त्यांच्यांत खळबळ उडाली.

समोर एक उंच भिंत होती. भिंतीच्या आंत बंकर्स होते अन् बंकर्समध्यें शत्रुसैनिक शस्त्रांसह लपून बसले होते. आतां कसें करायचें ? भिंत फोडण्याइतका वेळ नाहीं. समोरून गोळ्यांचा वर्षाव होत होता !

सुभेदार मनबहादुरनें क्षणभर विचार केला अन् आपल्या सैनिकांस आदेश दिला, 'चला, पुढें चला.'

अन् कुणाची पर्वा न करतां त्या गुरखा सैनिकांनीं समोरच्या भिंतीवर धडक मारून ती भिंत जमीनदोस्त केली. त्या भिंतीच्या आंत बंकर होता. बंकरमध्यें बसलेल्या गोलंदाजानें आपल्या तोफेचें तोंड गुरखा सैनिकांकडे फिरविण्यापूर्वींच गुरखा सैनिकांनीं त्याच्यावर गोळा फेकून त्याचा कपाळमोक्ष केला. गोलंदाज मेला नि बंकर धुरानें भरला !



धुरानें भरलेल्या त्या बंकरमध्यें गोलंदाजाचे दोन मदतनीस होते. गोलंदाज मरतांच ते दोघेहि बंकराबाहेर पळून जाऊं लागले, पण तितक्यांत मनबहादुरनें त्यांना अडविलें अन् दोघांच्याहि काळजांत कुकरी खुपसून त्यांना ठार केलें. आतां बंकर, त्यांत असलेली तोफ अन् दारूगोळा हीं गुरखा सैनिकांच्या ताब्यांत आलीं. मनबहादुरनें त्या तोफेनें दुसरा बंकर धुळीस मिळविला !

तिसरा बंकर दुसऱ्या बंकरापासून जरासा दूर होता. सुभेदार कांहींसा मागें हटला अन् आपल्या सैनिकांना म्हणाला, 'तुम्ही गोळीबार करतां करतां पुढें चला, म्हणजे शत्रुसैनिक गोळीबारांत गुंतले जातील. मी बंकरपाशीं जातों. राजबहादुर, तूं माझ्यासोबत ये.'

ते दोघेहि बहादुर रांगत रांगत तिसऱ्या बंकरापाशीं जाऊन पोहोंचले. राजबहादुरनें गोळा बाहेर काढला, त्याची क्लिप उघडली अन् तो गोळा बंकरांत फेकला पहिल्या गोळ्याचा आवाज थांबला नव्हता, तितक्यांत मनवहादुरानें दुसरा गोळा बंकरांत फेंकला.

त्या दोन्ही गोळ्यांच्या माऱ्यामुळें आंतले शत्रुसैनिक ठार होणें शक्य होतें; तथापि गुरखा सैनिकांना त्यांच्याविषयीं संशय वाटल्यानें ते रांगत रांगत बंकरांत घुसले अन् त्यांनीं अर्धमेल्या शत्रुसैनिकांच्या पोटांत कुकऱ्या खुपसून त्यांना ठार केलें.

तिकडे बाकीच्या गुरखा सैनिकांनीं शत्रुसैनिकांना सळो कीं पळो केलें होतें अन् ते कसाबसा आपला जीव वांचविण्याचा प्रयत्न करीत होते.

'पळपुट्यांचा पाठलाग करूं नका. त्या पुख्खा पठाणांना पोसायचें कुणी ?' मनबहादुरानें आपल्या सैनिकांना सांगितलें अन्

अपर संजोईवर कबजा केला. तिथें शत्रूचा एकहि शेंदाड शिपाई नव्हता.

अपर संजोईवरच्या आक्रमणाची बातमी अजून लोअर संजोईला कळली नव्हती. सुभेदार मनबहादुर बंकर तोडण्यांत आतां निष्णात झाला होता. त्यानें आपल्या सैनिकांच्या सहाय्यानें एक एक म्हणतां म्हणतां सारे बंकर्स उध्वस्त केले !

शत्रुसैनिकांनीं हा प्रकार पाहिल्यावर ते घाबरले अन् वाट फुटेल तिकडे पळून गेले. इतकी धामधूम चालली असतांहि त्यांचा ब्रिगेडियर डारडर झोंपलाच होता ! गुरखा सैनिकांनी ब्रिगेड हेडक्वार्टरवर हल्ला केला अन् हातीं सांपडलेल्या या ब्रिगेडियर कुंभकर्णाला कायमचेंच झोंपविलें !

त्यानंतर तो पहाडी प्रदेश ‘ जय हिंद ’ च्या जयजयकारानें दुमदुमून गेला. सूर्य माथ्यावर आला अन् त्याच वेळीं लोअर संजोई नि अपर संजोई येथील चौक्यांवर भारताचा तिरंगी ध्वज उभारला गेला ! त्यावेळीं गायिलेल्या ‘ जन गण मन ’ गीतानें तिथलें वातावरण साफ बदलून गेलें !

✦ ✦

# ४. लेफ्टनंट कर्नल नरेंद्रनाथ खन्ना

इंग्लिश भाषेंतल्या संवादाचा मराठी भाषेंत अनुवाद केला, तर तो असा होईल--

'तुम्ही फारच गोड आहांत!' कॉलेजमधल्या त्याच्या सहपाठिनीनें त्याला म्हटलें.

'मी ?' तो चकित झाला अन् त्यानें तिला विचारलें, 'पण तूं मला चाखून केव्हां पाहिलेंस ?'

'अनेकदां!' आपली खट्याळ नजर नाचवीत ती त्याला म्हणाली, 'मी माझ्या या डोळ्यांनीं तुम्हांला रोज चाखून पहात असतें. आज बोलल्याशिवाय रहावेना म्हणून मी बोललें इतकेंच.'

तो लाजला! एखाद्या सुंदर तरुणीनें एखाद्या अपरिचित तरुणाला वाटेंत थांबवून त्याच्या सौंदर्याची प्रशंसा केली कीं, कोणत्याहि तरुणाची अशी विचित्र अवस्था होणें साहजिकच असतें.

त्या छोट्याशा घटनेनेंच त्याला कवि बनविल्याचें सांगतात.

ही गोष्ट जुनी आहे. त्यानंतर कांहीं वर्षें निघून गेलीं. त्याच्यावर आषक असलेली ती कॉलेजकन्यका कुठें असेल तेंहि त्याला ठाऊक नव्हतें; पण तो मात्र भारतीय सैन्यांत एक मोठा अधिकारी होता. कांहीं वर्षांपूर्वीं चीनशीं झालेल्या युद्धांत त्यानें शौर्य गाजविलें होतें अन् आतां त्याला लेफ्टनंट कर्नलचा अधिकार प्राप्त झाला होता. यावेळीं तो पुंछ भागांतील आपल्या कामगिरीवर होता अन् पाकिस्तानच्या आक्रमणाला तोंड देत होता.

ही घटना १९६५ च्या सप्टेंबरांतली आहे. त्या दिवशीं चार तारीख होती. त्या दिवशीं लेफ्टनंट कर्नल सायंभोजनानंतर पुंछच्या पहाडी प्रदेशांत शांति अन् सौंदर्य हीं शोधून काढण्याचा प्रयत्न करीत होते. काश्मीरांतील शांति अन् सौंदर्य यांचा विध्वंस करण्याचा प्रयत्न पाकिस्ताननें चालविलेला असून आपल्याला त्यांचें रक्षण करायचें आहे हें त्यांना ठाऊक होतें.

तितक्यांत वायरलेसवरून त्यांच्या नांवाची घोषणा झाली. ते धांवत तिथें जाऊन पोहोंचले, त्यावेळीं कमांडिग ऑफिसर त्यांना फर्मावीत होते, 'हॅलो खन्ना, कमांडिग ऑफिसर इज धिस साइड.'

'गुड इविनिंग सर! खन्ना स्पीकिंग सर.'

'कोणतें तरी नवीन काव्य लिहीत आहांत कीं काय?'

'अशा स्थितींत काव्य कसें लिहितां येणार सर? चोहोंकडे युद्धाच्या ज्वाळा भडकताहेत!'

'तुम्ही घाबरलांत तर नाहीं ना? हवी तर मी बदली करतों तुमची.' कमांडिग ऑफिसरांनीं सांगितलें.

'नो सर!' खन्ना म्हणाले, 'घाबरणें मला ठाऊक नाहीं आपण ऑर्डर द्या.'

'पण पहिल्यान्दां तुम्ही तुमची कोरी करकरीत कविता मला ऐकवा.'

'ऐकणार साहेब ?' असें म्हणून खन्नांनीं आपली एक ताजी कविता त्यांना ऐकविली--

"आह ये नुकीली खुरदरी चट्टानें,
कर दी हैं लाल
सैनिक ने अपने लहू से ।
और इन वीरान पाषाण शिलाओं में
पूरा किया उसने
अपना संकल्प
दे दिया उसने अपना जीवन
तुम्हारे लिए ।"

'शाबास !' कमांडिग ऑफिसर म्हणाले, 'आघाडीवर आल्यानंतर तुमच्या कवितेची कल्पनाहि बदलली ! आतां मी तुम्हांला ऑर्डर देत आहें. तुम्ही तुमच्या तीनहि कंपन्या बरोबर घ्या अन् राजा चौकीवर हल्ला करा. परवां आम्हांला जय मिळाला नव्हता; पण उद्यां मात्र तुम्ही निश्चित विजयी व्हाल !'

'ओ. के. सर.'

ज्या अभेद्य चौकीवर शत्रूची ब्रिगेड आहे, त्या चौकीवर थोडयाशा सैनिकांसह हल्ला कसा करायचा याबद्दलच्या योजना रात्रभर खन्ना आंखीत होते. त्यांनीं बराच विचार केल्यावर अखेरीस निर्णय घेतला.

त्यांनीं दुसऱ्या दिवशीं पहांटेला कूच केलें. त्यांच्यासोबत शीख रेजिमेंटच्या तीन कंपन्या होत्या. शीख सैनिकांच्या शौर्यावर

त्यांचा पूर्ण विश्वास होता अन् त्या विश्वासामुळेंच ते पुढें जात होते.

राजा चौकी कांहीं अंतरावर असतांना त्यांनीं एक चांगलीशी जागा पाहिली अन् सैनिकांची तीन तुकड्यांत विभागणी केली. ती केल्यावर एका तुकडीनें डावीकडून, दुसऱ्या तुकडीनें उजवीकडून अन् तिसऱ्या तुकडीनें समोरून हल्ला करायचा असा त्यांनीं सैनिकांना आदेश दिला.

बघतां बघतां 'वाहे गुरु दी फतह' च्या गगनभेदी गर्जनेनें सारी चौकी घुमून गेली अन् त्याच वेळीं शत्रुसैनिकांची गाळण उडाली. अगतिक अवस्थेंत त्यांच्या तोफांची सरबत्तीं सुरू झाली!

भारतीय सैनिक स्वतःला सांभाळीत पुढें पुढें चालूं लागले. शत्रुसैनिक जराशा चांगल्या पोझिशनमध्यें होते. त्यांचे गोलंदाज बंकरांत लपून तोफा डागीत होते.

'थांबलांत कां?' कर्नल खन्ना मोठ्यानें ओरडले, 'आज आपल्याला राजा चौकी जिंकायची आहे! पुढें चला!'

'वाहे गुरु दी फतह!' सैनिकांनीं घोषणा केल्यावर ते दणादण चार्ज करूं लागले! हातबॉंब्स् नि रॉकेटस् हीं त्यांच्याकडून अचूक फेकलीं जाऊं लागलीं.

एकाच दमांत भारतीय सेनेच्या तीनहि कंपन्यांतले सैनिक शत्रुसैनिकांच्या जवळ जाऊन पोहोंचले. कर्नल खन्ना सर्वांच्या पुढें होते. तितक्यांत तोफेचा एक गोळा अचानक आला अन् त्यांच्या शेजारीं येऊन फुटला. त्याचा एक तुकडा त्यांच्या कुशींत घुसला अन् त्या कुशींतून भळभळां रक्त वाहूं लागलें. त्यांनीं पूर्वीं आपल्या काव्यांत वर्णन केल्याप्रमाणें तिथली सुळकेदार टेकडी त्यांच्या लाल रक्तानें रंगून गेली!

जखमी अवस्थेंत असतांनाच त्यांनीं सैनिकांना सांगितलें, ' चला, मर्दांनो, पुढें चला ! पाऊल मागें घेणें ही नामर्दपणाची निशाणी आहे ! '

तितक्यांत शब्दवेधी बाणाप्रमाणें एक गोळी आली अन् ती खन्नांच्या डाव्या दंडांत घुसली ! हात निकामी झाला !

' चला, पुढें चला ! ' खन्ना गरजले, ' जोंपर्यंत राजा चौकी हस्तगत झाली नाहीं, तोंपर्यंत आपण थांबायचें नाहीं ! '



तितक्यांत दुसरी एक गोळी समोरून आली अन् ती त्यांच्या मस्तकांत शिरली, त्याबरोबर त्यांची शुद्ध आस्ते आस्ते कमी होऊं लागली. खालीं कोसळतां कोसळतां ते सैनिकांना म्हणाले, ' माझी काळजी करूं नका. पुढें चला, चालत रहा ! '

आपला वरिष्ठ अधिकारी मेल्यावर किंवा खालीं कोसळून पडल्यावर सैनिकांचा धीर प्रायः खचला जातो; पण तिथें तसें

झालें नाहीं. त्या सैनिकांत दुप्पट उत्साह संचारला अन् ते सैनिक शत्रुसैनिकांवर आवेशानें तुटून पडले.

.. त्या सैनिकांत चांदसिह नांवाचा नाईक होता. त्याच्या अंगांत तर बारा रेड्यांचें बळ संचारलें ! त्यानें शत्रूच्या शस्त्रास्त्रांची पर्वा न करतां तो पिसाट हत्तीसारखा पुढें धांवत सुटला. समोर एक बंकर होता. त्यांत चोराप्रमाणें लपून बसलेले गोलंदाज तोफा डागीत होते. चांदसिहानें मागचा पुढचा विचार न करतां आपल्यापाशीं असलेल्या हातबाँबची क्लिप उघडली अन् तो हँडग्रेनेड दिला बंकरमध्यें फेकून !

ठो ! ठो ! ठो !

एक, दोन, तीन हातबाँबस् फेकून त्यानें आंतल्या तोफांचीं तोंडें बंद पाडलीं. आंतले गोलंदाज जागच्या जागींच मरून पडले.

बाहेरच्या शत्रुसैनिकांपैकीं बऱ्याचशा सैनिकांना भारतीय सैनिकांनीं ठार केलें अन् कांहीं सैनिक जिवाच्या भयानें पळून गेले.

लढाई आटोपतांच भारतीय सैनिकांना कर्नलची काळजी लागली.

चांदसिह धांवत लष्करी हॉस्पिटलांत गेला.

त्यापूर्वीं कर्नल खन्नांना ॲम्ब्युलन्स कारमधून हॉस्पिटलांत पोंचविलें होतें.

'काय हकीकत आहे चांदसिह ?' खन्नांनीं विचारलें.

'ठीक आहे सर ! राजा चौकीवर आम्ही कबजा केला.'

'शाबास ! माझ्यातर्फे सर्वांना शाबासकी दे. मी चाललों !'

कर्नल खन्नांनीं अखेरचा श्वास सोडला अन् एखाद्या कर्मनिष्ठ योग्याप्रमाणें आपल्या नश्वर देहाचा त्याग केला !

# ५: रिसालदार आयूब

दिनांक आठ सप्टेंबर एकोणीसशें पासष्ट. संध्याकाळचा समय. जम्मू–सियालकोट राजरस्त्यावरील सुचेतगढची छावणी.

कमांडिग ऑफिसरचें डोकें गरगरूं लागलें होतें.

पाकिस्तानचे पॅटन टँक्स दहा तारखेपर्यंत यायचे होते तिथें. ते ज्या वेगानें मार्ग आक्रमीत होते, त्या वेगावरून पहातां ते त्या दिवशीं तिथें येऊन पोहोंचणार होते. शत्रूच्या हालचालीची बित्तं-बातमी काढणाऱ्या भारतीय गस्ती सैनिकांकडून वायरलेसच्याद्वारें कमांडिग ऑफिसरला तसें कळविण्यांत आलें होतें.

संकटसमयीं धैर्य हाच सन्मित्र ठरत असतो !

कमांडिग ऑफिसरनें रिसालदार आयूबला बोलाविलें अन् त्याला विचारलें, 'आयूब, तूं मरायला तयार आहेस का ?'

त्यावर आयूब म्हणाला, 'जहे किस्मत ! यह मौत अल्ला-हने दी तो मैं उस का शुक्रगुजार हूँगा !'

'तर मग उद्यां तूं आघाडीवर जायचें अन् पाकिस्तानचे

पॅटन रणगाडे थोपवून धरायचे !' कमांडिंग ऑफिसर त्याला सांगू लागला, 'तुझ्या मदतीला दोन रणगाडे असतील; तथापि तूं ट्रुप कमांडरचें सोंग वठवावयाचें. तूं सर्वांच्या पुढें रहायचें अन् रिसालदार आयूबनें पाकिस्तानच्या आयूबला धूळ चारायची अशी माझी इच्छा आहे. तसें करतांना तूं जगलास किंवा मेलास, तरी तुझ्यामुळें आपला भारत मात्र खात्रीनें जगेल ! पाठीमागून पायदळाची अन् वरून हवाई दलाची तुला मदत मिळेल; तथापि तुला मात्र पराकाष्ठा करावी लागेल !'

'हुजूर, आपण काडीमात्र काळजी करूं नका.' रिसालदार आयूब म्हणाला, 'माझ्यासारखा एक क्षुद्र माणूस देशाच्या कामीं आला, तर ती मोठ्या भाग्याचीच गोष्ट असें मी समजेन. अन् इतकेंहि करून मी एका खानदानी घराण्यांत जन्माला आलों आहें. हुजूरांना कदाचित ठाऊकहि नसेल; पण माझे आजोबा आलम अलीखान हे लष्करांत होते अन् ते दुसऱ्या महायुद्धांत लढले होते. वालिद इमाम अलीखान याच रेजिमेंटमध्यें दफेदार मेजर होते अन् दुसऱ्या महायुद्धांत त्यांनींहि शत्रूचा धुव्वा उडविला होता. आतां ते रिटायर झाले आहेत; पण जर मी उद्यां देशाच्या कामीं आलों तर ते स्वत:चा गौरवच समजतील. माझे मोठे चुलते फैज मुहम्मद अन् मरहूम चुलते मुहम्मद यासीन हे दोघेहि सैन्यांत होते. अजूनहि त्यांना सरकारकडून पेन्शन मिळतें. तर मग हुजूर, माझी काळजीच सोडा. हा आयूब जनरल आयूबशीं मुकाबला करणार अन् तोहि निकराचा करणार !'

'ठीक आहे. मग उद्यां तुला आघाडीवर जायचें हें निश्चित ठरलें. तूं माझ्या शिरावरचें ओझें बरेंचसें हलकें केलें आहेस. देव तुला विजयी करो !'

सैनिकी पद्धतीप्रमाणें रिसालदार आयूबनें कमांडिंग ऑफिसरला सॅल्यूट केल्यावर तो मागें परतला अन् पुढच्या तयारीला लागला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं रिसालदार आयूबनें दोन रणगाडे आपल्यासोबत घेतले अन् शत्रुसैन्याशीं मुकाबला करण्यासाठीं तो आघाडीवर जाण्यासाठीं निघाला.

परिस्थिति गंभीर होती अन् मोठा मुकाबला करायचा होता. शत्रुसैनिकांनीं त्याचे ते रणगाडे दुरून पाहिले अन् फायरिंग सुरू केलें. त्यांच्या पॅटन टॅंकमधून सुटलेले गोळे जमिनींत घुसत अन् आजूबाजूला धूर नि धुरळा यांचा थर पसरवीत असत.

भारतीय सैन्याचे टॅंक्स त्यांची जरासुद्धां पर्वा न करतां पुढें पुढे जात होते.


हवालदार हमीदनें वायरलेसवरून विचारलें, 'आतां फायरिंग चालू करूं का ?'

'इतक्यांत नको !' रिसालदार आयूब म्हणाला, 'जरा पुढें चल. पोझिशन घेऊन फायरिंग केलें, तरच तें योग्य ठरतें.'

भारतीय सैनिकांचे टॅंक्स मदमस्त हत्तींप्रमाणें पुढें पुढें चालले होते. वर आकाशांत शत्रूच्या जेट अन् स्टार फायटर्स विमानांशीं भारतीय हवाई दलांतील नॅट अन् हंटर हीं विमानें मुकाबला करीत होतीं. समोरून शत्रुसैनिक बेफाम फायरिंग करीत होते; पण शत्रूच्या रणगाड्यांत बसलेल्या गोलंदाजांनीं त्या दिवशीं कुणाचें तोंड पाहिलें होतें कुणास ठाऊक, त्यांचा एकहि गोळा अचूक पडत नव्हता. कदाचित ते घाबरले होते अन् त्यामुळेंच तसें होत होतें. असेल. तसें होणें साहजिक असतें.

'फायर!' रिसालदार आयूबनें आपल्या साथीदारांस सांगितलें अन् स्वतः फायरिंग चालूं केलें.

पहिल्याच गोळ्यानें शत्रूचा एक पॅटन टँक खिळखिळा झाला अन् आंत बसलेला गोलंदाज मारला गेला.



अब्दुल हमीदनें दुसऱ्या एका रणगाड्याचें कंबरडें मोडून टाकलें. भारतीय रणगाडे दुप्पट जोरानें पुढचा मार्ग आक्रमूं लागले.

रिसालदार आयूब म्हणाला, 'चला, पुढें चला. एवींतेवीं आपल्याला मरायचेंच आहे, मग भ्यायचें कुणाला! शत्रूला मागें हटवा. तुम्ही पुढें चला.'

तितक्यांत जमालुद्दीन किडवाई पुढें झाला अन् त्यानें एक चिलखती गाडा खिळखिळा केला. भारतीय सैनिकांच्या गोळ्यांमुळें जमीन थरथर कांपूं लागली अन् शत्रुसैनिकांची पावलें मागें माग हटूं लागलीं.

रिसालदार आयूबनें वायरलेसवरून कमांडिंग ऑफिसरला सांगितलें, 'सर, आम्ही आतांपर्यंत शत्रूचे दोन टँक्स अन् एक चिलखती गाडा अशीं तीन वाहनें निकामी केलीं आहेत. माणसांच्या मरणाचा हिशेब यावेळीं देतां येत नाहीं !'

'शाबास !' कमांडिंग ऑफिसर म्हणाला, 'कांहीं का होईना, पण सध्यां तुझे ग्रह उच्चीचे आहेत ही गोष्ट सत्य.'

दोघांच्यांत बोलणें चालू होतें, तितक्यांत हवालदार हमीदनें कुणाला न विचारतां शत्रूच्या एका टँकवर नेम धरून तोफ डागली त्याबरोबर तो टँक जळूं लागला नि अखेरीस खाक झाला !

दुसऱ्या राउंड फायरमध्यें रिसालदार आयूबनें एक पॅटन टँक खिळखिळा केला.

अशा प्रकारें त्या युद्धाच्या यज्ञकुंडांत चार पॅटन टँक्स अन् एक चिलखती गाडा अशा पांच समिधांची आहुति दिल्यावर शत्रूचे सैनिक पळून गेले. त्या दिवशीं शत्रूच्या तीन कंपन्यांना चांगलाच मार खावा लागला. पळतां पळतां एका गोलंदाजानें आपला टँक तिथेंच सोडला नि तो पळून गेला. भारतीय सैनिकांनीं निकामीं झालेलीं वाहनें आघाडीवरच सोडलीं अन् दुरुस्त असलेला एक टँक घेऊन ते आघाडीवरून छावणींत परतले.

छावणींत आल्यावर हवालदार हमीद रिसालदार आयूबला म्हणाला, 'सर, आज मजा नाहीं आली !'

'सर नव्हे, यार म्हण !' आयूब हमीदला म्हणाला.

'हं, यार, आज मजा नाहीं आली !'

‘ कां ?’

‘ साले पटकन् पळून गेले ! त्यांना पिटून काढतां आलें असतें तर थोडीशी मजा वाटली असती !’

‘ खरें आहे तुझें म्हणणें. या पॅटन टँकच्या बाबतींत पाकिस्तान अन् अमेरिका यांनीं हवेंत हवेल्या उभारल्या होत्या; पण त्या ढांसळल्या !’

◆ ◆

## ५. हवालदार अब्दुल हमीद

अकरा सप्टेंबर एकोणीसशें पासष्ट.

अठरा दिवसांत अठरा अक्षौहिणी सैन्याचा फडशा पाडणारें एक युद्ध पूर्वी कौरव नि पांडव यांच्यांत झालें होतें तें तुम्हांला माहीत असेलच. त्या युद्धाच्या वेळीं कौरवांनीं रचलेल्या सैन्याच्या चक्रव्यूहांत अभिमन्यु शिरला असतां कौरवांनीं त्याची काय अवस्था केली, तेंहि तुम्हांला माहीत असेल.

असाच प्रकार एकोणीसशें पासष्ट सालच्या भारत–पाकिस्तान युद्धांत घडला होता. तो दिवस अकरा सप्टेंबरचा होता !

त्या दिवशीं पाकिस्ταननें आपलें सारें सामर्थ्य पणाला लावलें होतें. त्यानें आपल्या एका मेजर जनरलच्या आधिपत्याखालीं एका ब्रिगेडियरसह सैनिकांची एक पुरी ब्रिगेड मृत्यूच्या मुखांत लोटण्यासाठीं आघाडीवर आणली होती. त्याशिवाय चिलखती गाड्या अन् पॅटन टँक्स यांची एक डिव्हिजन आघाडीवर खडी होती. भारत देश आपलें लाहोर शहर बळकावील या

भीतीमुळें ही सारी युद्धाची तयारी !

वास्तविक हा पाकिस्तानचा मूर्खपणा तर होताच, शिवाय नादानपणाहि होता. भारताला पाकिस्तानशीं युद्ध करण्याची मुळींच इच्छा नव्हती; तथापि त्यानें युद्धाचें आव्हान दिल्यावर तें स्वीकारणें हें क्रमप्राप्त होतें. शांततेसाठीं जर युद्ध करावें लागलें तर युद्ध करणें योग्यच असतें.

बचावाचें निमित्त करून शत्रु तीन बाजूंनीं पुढें सरकत होता त्याच्याशीं मुकाबला करण्यासाठीं पुढच्या रांगेंत कंपनी क्वार्टर मास्टर हवालदार अब्दुल हमीद हे होते. ते आपल्या जीप गाडींत बसले होते. त्यांच्या जीपमध्यें लढण्यासाठीं रिकॉयल लॅसगन होती. तिचा मारा केवळ सहाशें यार्डांपर्यंतच होत असे. त्याशिवाय जीपमध्यें कांहीं हातगोळेहि होते.

शत्रूचे पॅटन टॅंक्स समोरून पुढें पुढें येत होते. सुमारें अठ- राशें यार्डांवरून ते आपल्या दिशेनें येत असल्याचें हवालदार हमीद यांनीं पहातांच त्यांनीं आपल्या साथीदारांना आदेश दिला,

'पुढें चला !'

हवालदार हमीद यांची जीप चालू झाली अन् एका दमांत शत्रूच्या टॅंक्सपासून सहाशें यार्डांवर जाऊन उभी राहिली.

समोरून शत्रूचे टॅंक्स आग ओकीत होते, तथापि भारतीय सैनिकांवर हा वेळपावेतों त्याचा अनिष्ट परिणाम झाला नव्हत. असें असलें, तरी त्यांनीं पुढें जाणें मात्र धोक्याचें होतें. पेटत्या आगींत उडी टाकण्यासारखेंच होतें तें !

हवालदार हमीद गरजले, 'यांना हांकून लावा इथून ! त्यांच्या टॅंक्सचा चक्काचूर करा.'



असें म्हणूनच ते थांबले नाहींत, तर एखादा चतुर खेळाडू ज्याप्रमाणें हातांतला बॉल सहजतेनें बास्केटमध्यें फेकतो, त्याप्रमाणें त्यांनीं एक गोळा रिकॉयल लॅसगनवर ठेवला अन् अंदाजानें तो फेकला. फेकलेला गोळा टँकमध्यें घुसून फुटला अन् त्याचवेळीं तो पॅटन टँकहि फुटून गेला !

'पुढें चला अन् चार्ज करा !' ते पुन्हां गरजले अन् त्यांनीं आपलें काम चालूंच ठेवलें. त्यांनीं दुसरा गोळा फेकला अन् तो फेकतांना आपल्या कौशल्याचीहि कमालच केली. तो टँक पेटूं लागला.

'थांबूं नका अन् वांकूंहि नका !' हमीद रणक्षेत्रावर गर्जना करीत होते अन् त्याचवेळीं शत्रूचे कर्दनकाळ बनून त्याच्यावर गोळ्यांचा वर्षावहि करीत होते. समोरील सैनिकांच्या मरणकाळच्या किंकाळ्या कानीं पडणेंहि कठीण झालें होतें.

दोन टँक्स खिळखिळे होऊन पडले होते अन् तिसरा...

घ्या ! तिसऱ्या टँकमध्येंहि हवालदार हमीद यांचा गोळा जाऊन पडला.

'धडाम...धूम !'

'हवालदार हमीद !'

'झिंदाबाद !'

'हवालदार हमीद !'

'झिंदाबाद !'

'नाहीं, नाहीं, भारत देश !' हमीद गरजले.

'झिंदाबाद !'

'भारतमाता !'

'झिंदाबाद !'

चौथा गोळा हमीद यांच्या हातांत होता. त्यांनीं पाहिलें, जळत असलेल्या तीन टँक्सच्या पलीकडे फेकलेला गोळा जाणार नाहीं. असें त्यांना दिसून येतांच त्यांनीं आपल्या जीपमधले कांहीं गोळे बाहेर काढून हातांत घेतले नि स्वत:ची जीप सोडून देऊन त्यांनीं भुकेलेल्या सिंहाप्रमाणें शत्रूवर हल्ला चढविला.

'पुढें चला, जवानांनो, पुढें चला !' असा त्यांनीं सोबतच्या सैनिकांना आदेश दिला.

आपल्या अधिकाऱ्याचें तें धाडस पाहिल्यावर सारे सैनिक पुढें सरसावले नि त्यांनीं नापाक पाकड्यांचा पुरता धुव्वा उडविला.

अन् त्या दिवशीं महाभारताची पुनरावृत्ति झाली ! वीर अभिमन्यु आपल्या जिवावर उदार होऊन द्रोणाचार्यांनीं रचिलेल्या चक्रव्यूहांत शिरला होता, त्याप्रमाणें त्या दिवशीं हवालदार हमीदहि खेमकरणच्या सैन्यव्यूहांत शिरले. ते सैन्यव्यूहाच्या प्रवेशद्वारापाशीं पोहोंचतात न पोहोंचतात, तोंच शत्रूचे सारे

गोलंदाज त्यांच्यावर एकदम तुटून पडले अन् हवालदार हमीद तिथेंच कोसळले.

पहिल्यानदां हमीद यांचा पाय मोडला, तेव्हां एक सैनिक पट्टी घेऊन ती त्यांच्या पायाला बांधण्यासाठीं पुढें धांवून गेला. त्याला पहातांच हमीद म्हणाले, 'यावेळीं माझ्याकडे लक्ष देऊं नका. अगोदर समोरच्या शत्रुसैनिकांना निपटून काढा.'

जें हवालदार हमीदांनीं आतांपर्यंत केलें होतें, तेंच शत्रूच्या सैनिकांना निपटून काढण्याचें कार्य भारतीय क्रुद्ध सैनिक करूं लागले. खुद्द हमीदहि पोटावर रांगत रांगत पुढें पुढें जाऊं लागले. ते सुमारें दोन यार्ड अंतर पुढें सरसावले असतील, तोंच शत्रूच्या सैनिकांनीं फेंकलेला गोळा त्यांच्या अंगांत शिरला अन् ते लगेच गतप्राण झाले.

पण त्याच वेळीं पळपुटे पाकडे रणक्षेत्र सोडून मागें पळत सुटले !

हवालदार हमीद यांनीं ज्या जीपमध्यें बसून शत्रूच्या तीन पॅटन टॅंक्सचा विध्वंस केला होता, त्या जीपमध्यें भारतीय सैनिकांनीं त्यांचा मृत देह ठेवला अन् ते मागें परतले.

भारतीय सैनिकांनीं खेमकरण रणक्षेत्रावर त्या दिवशीं जरी विजय मिळविला, तरी त्याच दिवशीं त्यांची छावणी दुःखानें व्याकुळ झाली होती ! केवळ छावणीच नव्हे, तर सारा भारत शोकाकुल बनला होता ! !

◆ ◆

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे .
वा. क्र. ९६५६२ ३१/१/७६
दि.

# ७. मेजर मेघसिंह

' मेजर मेघसिंह मी आज आपल्याला अभेद्य अशा आघाडी-वर पाठविणार आहें. ' कमांडिंग ऑफिसरनें सांगितलें.

' मी तो माझा बहुमान समजेन सर ! आपण हुकूम द्या मला. ' मेजर मेघसिंह म्हणाले.

'कोटलीबंदी–गोपाळपूर रस्त्यावर एक पूल आहे. तो जर उडवून दिला, तर आपला शत्रु कमजोर अन् अगतिक बनेल; तथापि त्या पुलावर शत्रुसैनिकांचा कडक पहारा आहे. शत्रूचा विमानतळहि तिथेंच आहे हें काम सावधगिरीनेंच पार पाडण्या-सारखें आहे. आपला आजवरचा अनुभव पाहिल्यावरच या काम-गिरीबद्दल मी आपल्यावर विश्वास ठेवीत आहें. आपण ही कामगिरी पार पाडाल काय ?' कमांडिंग ऑफिसरनें मेजर मेघसिंहांना पुन्हा विचारलें.

त्यावर मेघसिंह म्हणाले, ' सर, देवानें दया केली, तर आज रात्रींच तो पूल उडवून दिला जाईल अन् उद्यां सकाळपर्यंत तसें

आपल्याला कळविण्यांत येईल.'


'मग आपल्याला मदतीसाठीं किती सैनिकांची गरज आहे?'

'फक्त चार सैनिकांची सर!'

'ठीक आहे. तयारीला लागा. मी ऑर्डर तयार करतों.'

ही घटना एकोणीसशें पासष्ट सालच्या सप्टेंबर महिन्यांतली आहे उढी–पुंछ भागांत शत्रु अजूनहि अजगरासारखें वेटोळें घालून बसला होता. त्याला तिथून हुसकावून लावणें अगत्याचें होतें अन् त्याला हटविण्यासाठीं तो पूल उध्वस्त करणें हें पहिलें पाऊल होतें.

मेजर मेघसिंहांनीं चार सैनिक बरोबर घेतले अन् संध्याकाळ होण्यापूर्वींच आपल्या कामगिरीसाठीं ते छावणीबाहेर पडले.



'वाटेंत एक नव्हे, दोन नव्हेत, तर शत्रूच्या सात चौक्या होत्या अन् प्रत्येक चौकीवर शत्रूनें तोफा सज्ज करून ठेवल्या होत्या. हें काम मोठ्या हुषारीनेंच पार पाडलें पाहिजे, त्या बाब-

तींत जर जराशी कसूर झाली, तर तें काम बिघडल्याशिवाय रहाणार नाहीं हें मेजर मेघसिंहांना माहीत होतें.

त्यांनीं मोठ्या सावधगिरीनें त्या सातहि चौक्या पार पाडल्या अन् ते पुलापाशीं जाऊन पोहोंचले. कर्मधर्मसंयोगानें तिथें शत्रूचे सैनिक नव्हते त्यांनीं ती संधि साधली अन् पुलाला सुरुंग लावले. मध्यरात्रीच्या सुमारास त्यांनी पलिते पेटविले अन् ते शत्रूच्या खंदकांत लपून बसले. थोड्या वेळानें अचानक स्फोट होतांच शत्रु जागा झाला; पण त्यावेळींच तो पूल उध्वस्त होऊन पडला होता.

(२)

दिनांक सहा सप्टेंबर रोजीं मेजर मेघसिंहांना दुसरा एक हुकूम मिळाला त्या हुकमाप्रमाणें त्यांनी पाकिस्तानच्या नेजापीर चौकीवर कबजा करायचा होता.

'ओ. के. सर!' असें म्हणून मेजर मेघसिंह आपल्या कामगिरीवर जाण्यासाठीं निघाले. त्यांच्यासोबत त्यावेळीं फक्त साठ सैनिक होते.

ती सैनिकांची तुकडी पहांटे पांच वाजतां नेजापीरपाशीं जाऊन पोहोंचली मात्र, समोरून मशिनगन्स अन् रायफल्स यांचा मारा सुरू झाला; पण त्याची पर्वा कुणाला होती? मेजर मेघसिंहांनी सिंहासारखी गर्जना करतांच सोबतचे सारे सैनिक शत्रुसैनिकांवर भुकेलेल्या लांडग्यांसारखे तुटून पडले अन् त्यांनीं कांहीं मिनिटांतच त्यांचा धुव्वा उडविला

त्यानंतर मेजर मेघसिंहांनी वायरलेसवरून कमांडिंग ऑफिसरला कळविलें, 'सर, नेजापीर चौकी आतां आमच्या ताब्यांत आली आहे. शत्रूचे दोन सैनिक मेले, पंधरा जखमी झाले

अन् दोघांना आम्ही कैद केलें आहे. आतां आपली आज्ञा असेल तर लगेच अरीढोकहि कबजात घेऊं. अरीढोक इथून फक्त दोनच मैलांवर आहे.'

(३)

मेघसिहांना आज्ञा मिळतांच त्यांनीं आपल्यासोबत फक्त पंधराच सैनिक घेतले अन् ते अरीढोकला रवाना झाले.

शत्रुची कुवत किती आहे, याचा अंदाज त्यांना पूर्वींच आला होता.

चौकीपासून सुमारें तीनशें यार्डांवर आल्यानंतर त्यांनीं शत्रूला आव्हान दिलें अन् रॉकेटस्चा मारा चालू केला.

त्यावेळीं भारतमातेच्या जयजयकारानें तिथलें वातावरण इतकें दुमदुमलें कीं, शत्रूला हल्ला करण्याचें सुचलेंच नाहीं ! त्या चौकीवर मेघसिहांनी कबजा केल्याचें कमांडिंग ऑफिसरला कळविलें.

(४)

हाजीपीर खिंडीपाशींच शत्रूचा दुसराहि एक पूल होता. तो उडवून लावण्याचें काम नऊ सप्टेंबर रोजी मेजर मेघसिहांकडेच सोंपविण्यांत आलें.

आपल्या परंपरेप्रमाणें त्यांनीं थोडेसे सैनिक बरोबर घेतले अन् त्यांच्या मदतीनें तो पूल त्यानीं उडवून लावला ! आतां भारतीय सैनिकांना पुढचा मार्ग साफ मोकळा झाला होता.

(५)

'हॅलो सर, मी मेजर मेघसिंह बोलतों आहें !'

'यस् मेजर, कमांडिंग ऑफिसर स्पीकिंग, धिस साइड !'

'सर, मला फक्त अडीच तासांचा अवधि द्या, म्हणजे मी उढी अन् पुंछ या दरम्यानचा मार्ग मोकळा करतों !'

'पण...'

'पण बिण कांहीं नाहीं हुजूर ! शत्रुसैनिकांची संख्या किती आहे तें ठाऊक आहे मला; तथापि त्या सैनिकांत मुळींच दम नाहीं ! आपण फक्त आज्ञा द्या मला !'

'तर मग माझी मान्यता आहे'

मेजर मेघसिंहांनीं आपल्या सोबत थोडेसे सैनिक घेतले अन् त्यांच्यासह अडीच तासांच्या आंतच कहूता कालव्यावरचा पूल पार केला, त्यावेळीं शत्रुसैनिकांनीं गोळीबाराला सुरवात केली. दोन्ही पक्षांत सुमारें साडेचार तास युद्ध चाललें.

मेजर मेघसिंहांनीं स्वतःचे अन् सोबतच्या साऱ्या सैनिकांचें संरक्षण केलेंच; पण त्याबरोबरच शत्रूच्या दीडशें सैनिकांना यमसदनास पाठविलें. त्यांनीं कहूता कालव्यावर कबजा करून आपल्या विजयाचें एक उदाहरण दाखवून दिलें.

(६)

मेघसिंहांपाशीं असलेल्या सैनिकांपैकीं थोडेसे सैनिक कहूता कालव्यावरील पुलाच्या रक्षणासाठीं ठेवून बाकीच्या सैनिकांसह पुढें जाण्याचा हुकूम मेजर मेघसिंहांना मिळाला.

शत्रूनें गोळीबार सुरू केला; पण १९६५ सालांतल्या त्या वीर अर्जुनाला आव्हान देणारा अजून जन्माला आला नव्हता ! अर्ध्या तासाच्या आंतच शत्रूनें रणक्षेत्र सोडलें अन् 'भारतमाता की जय' च्या घोषणांनीं तिथलें वातावरण दुमदुमून गेले.

उढी अन् हाजीपीर खिंड या दोन्ही ठिकाणचे भारतीय सैनिक एकमेकांना भेटण्याची ती कामगिरी फार मोलाची होती

अन् ती मेजर मेघसिंहांनीं पार पाडली होती.

त्या दोन्ही ठिकाणीं असलेले सैनिक जेव्हां एकमेकांना भेटले, तेव्हां सर्वांना राम नि भरत यांच्या भेटीची आठवण झाली.

(७)

उढी–पुंछ अन् हाजीपीर खिड येथें भारतीय सैनिकांचा हक्क स्थापित झाल्यावर कमांडिग ऑफिसरनें मेजर मेघसिंहांना त्यांच्याबरोबर असलेल्या सैनिकांसह छंब विभागांत पाठवून दिलें.

त्या दिवशीं सप्टेंबरची एकोणीस तारीख होती.

त्या दिवशीं आपल्या सोबतच्या केवळ पस्तीस सैसिकांसह मेजर मेघसिंह शत्रूच्या एका कंपनीवर तुटून पडले.

रात्रीचा दाट काळोख होता. शत्रूकडून तोफांचा मारा चालू होता अन् अशा वेळीं मेजर मेघसिंह गरजले–

‘ चार्ली कंपनी फ्रॉम लेफ्ट साइड. ’

त्यावर सब लीडरनें सांगितलें, ‘ ऑल राइट सर ! ’

‘ डेल्टा कंपनी फ्रॉम राइट साइड ! अटॅक ! अटॅक ! अटॅक ! ’

सब लीडरकडून आवाज आला, ‘ ओ. के. सर ! ’

भारतीय सैनिकांच्या किमान दोन कंपन्या, किंबहुना जास्तच असाव्यात असें शत्रुसैनिकांना वाटलें. छत्तीस रायफलींचा एकदम आवाज होतांच शत्रूचे सारे सैनिक पळत सुटले !

ते पळत असतां एका भारतीय सैनिकानें पाकिस्तानच्या एका कमांडरवर नेम धरून बंदुकीची गोळी झाडली नि त्याला ठार केलें.

त्या धुमश्चक्रींत जवळ जवळ चाळीस पाकिस्तानी पळपुटे

सैनिक मारले गेले अन् दहा सैनिकांना कैद करण्यांत आलें.

अटक केलेल्या पाकिस्तानी सैनिकांपैकीं एक सैनिक घाबरला अन् त्यानें एका पाकिस्तानी शस्त्रागाराचा भारतीय सैनिकांना ठावठिकाणा सांगितला. पळून जाण्यापूर्वी पाक सैनिकांनीं त्या शस्त्रागारांतल्या शस्त्रांचा नाश केला नव्हता नि तीं बरोबरहि घेतलीं नव्हतीं, त्यामुळें थोड्याच वेळांत मेजर मेघसिहांनीं तें शस्त्रागार आपल्या ताब्यांत घेतलें! ती कमाई त्यांच्या कष्टाची होती! तें शस्त्रागार हें त्यांच्या पराक्रमाचें प्रतीक होतें!

(८)

'आधींच झालें थोडें अन् त्यांत व्याह्यानें धाडलें घोडें!' या म्हणीप्रमाणें मेजर मेघसिह छंब विभागांतल्या कटकटींतून मोकळे झाले न झाले, तोंच कमांडरनें त्यांना अखनूर भागांत पाठविलें.

दिनांक एकवीस सप्टेंबर रोजीं कमांडिंग ऑफिसरला एक गुप्त वातमी कळली. अखनूरमध्यें शत्रूचें एक मोठें शस्त्रागार होतें. तें ताब्यांत तरी घ्यायचें किंवा नष्ट तरी करायचें होतें!

कमांडिंग ऑफिसरनें त्या गोष्टीची मेजर मेघसिहांना जाणीव करून दिली अन् मेघसिह आपल्या कामगिरीवर निघून गेले.

त्यावेळीं त्यांच्यासोबत फक्त पन्नास सैनिक होते. ज्यावेळीं ते आपल्या इष्ट स्थळीं जाऊन पोहोंचले, त्यावेळीं तीनशें पाकड्या सैनिकांनीं त्यांना आव्हान केलें नि ते त्यांच्यावर तोफा डागूं लागले.

मेघसिह् अन् त्यांच्या सोबतचे सैनिक यांनींहि गोळीबार चालू केला. तशाहि स्थितींत ते रणवीर पुढेंपुढें चालतच होते.

नेहमींप्रमाणें त्या दिवशींहि मेजर मेघसिह सैनिकांच्या पुढें होते. चालतां चालतां शत्रुसैनिकांकडून आलेली एक गोळी त्यांच्या उजव्या खांद्यांत घुसली. त्यांना तिची जाणीव होते न होते इतक्यांत दुसरी एक गोळी त्यांच्या जांघेंत शिरली अन् ते खालीं कोसळले.

भारतीय सैनिकांनीं तें दृश्य पाहिलें मात्र, त्यांना भयंकर आवेश चढला अन् त्या भरांत त्यांनीं कांहीं मिनिटांतच शेंकडों पाकिस्तानी सैनिकांचे मुडदे पाडले ! त्यानंतर शत्रुसैनिक तिथें थांबले नाहींत.

जखमी अवस्थेंत असतांना मेजर मेघसिहांना युद्धस्थ सैनिक इस्पितळांत दाखल करण्यांत आलें.

भारत सरकारनें इस्पितळांतच त्या वीराला वीरचक्रानें विभूषित केलें !

# ८. शिपाई बालम राम

एका मिनिटांत पंचवीसशें गोळ्या! त्या अमेरिकन मशिनगन्सची स्पीड कमाल होती अन् दुसरी कमाल म्हणजे शत्रु कुठें लपला आहे तेंहि कळत नव्हतें!

भारतीय सैनिकांना आज प्रथमच माघार घ्यावी लागणार असें प्रथम वाटलें; पण तितक्यांत शिपाई बालम राम पुढें झाला अन् कमांडिग ऑफिसरच्या कानांत कुजबुजला, 'सर, पिल बॉक्स!'

'अँ?' कमांडिग ऑफिसर जरासा चपापला.

'होय सर,' बालम राम त्याला पुढें सांगू लागला, 'सर, शत्रु बुरख्यांत लपून लढतो आहे. त्याला आम्हीं दिसतों; पण तो आम्हांला दिसत नाहीं!'

कमांडिग ऑफिसरनें दुसऱ्याच क्षणीं गोलदाजांना आदेश दिला, 'अटॅक!'

शंभर शंभर पौंडांचे कांहीं बॉम्ब पिल बॉक्सवर पडले; पण

पक्क्या फरशीवर मातीचें ढेकूळ पडल्यावर जो परिणाम होतो, त्यापेक्षां जास्त कांहीं परिणाम त्या पिल बॉक्सवर झाला नाहीं !

'हजार पौंड !' कमांडिग ऑफिसर गरजला.

हिमालयाच्या एखाद्या शिखरावरून खालीं कोसळलेल्या खडकाचे तुकडे तुकडे होऊन ते जसे चोहोंकडे विखुरले जातात, तसेच त्या पोलादी पिल बॉक्सवर फेकलेल्या बॉम्बचे तुकडे तुकडे होऊन ते चोहींकडे विखुरले गेले !

'आतां कसें करायचें ?' कमांडिग ऑफिसर थोडा वेळ विचारांत गढून गेला; पण तितक्यांत शिपाई बालम राम पुढें झाला अन् तो कमांडिग ऑफिसरला म्हणाला, 'सर, शत्रूचा हा दुर्गम दुर्ग मी टाकतों फोडून !'

'कसा ?' कमांडिग ऑफिसरनें त्याला विचारलें, 'हजार पौंडी बॉम्बस् निकामी ठरल्याचें तूं पाहिलें नाहींस का ?'

'पाहिलं सर, पण मी ही पिल बॉक्स फोडणार. आपण मला तेवढी संधी देऊन पहा !'

शरमून गेलेल्या मितभाषी कमांडिग ऑफिसरला त्या तरण्याताठ्या शिपायाचें अघळपघळ बोलणें आवडलें नाहीं; तथापि तो त्याला म्हणाला, 'अच्छा ! प्रयत्न करून पहा !'

पडत्या फळाची आज्ञा मिळतांच बालम रामनें आपल्या हातांत दोन तीन बॉंब्स घेतले अन् तो जमिनीवरून रांगत रांगत त्या पिल बॉक्सपाशीं जाऊन पोहोंचला.

त्यानें पिल बॉक्सच्या खिडकीवर हात ठेवल्याबरोबर ती खिडकी उघडली. लगेच बालम रामनें खिडकींतून बॉंब फेकला.

धूर अन् धुरळा यांनीं ती पिल बॉक्स भरून गेली !



बाहेर जास्त वेळ उभें रहाणें योग्य नव्हे असें वालम रामला वाटल्यामुळें त्यानें खिडकींतून आंत उडी मारली.

आंत तीन गोलंदाज होते. त्यांपैकीं दोघांना त्यानें संगिनीनें ठार केलें अन् तिसऱ्याला पकडून पिल बॉक्सच्या बाहेर आणलें !

'शाबास !' कमांडिग ऑफिसरनें त्याची पाठ थोपटली अन् तो त्याला म्हणाला, 'आतां मात्र तूं गड जिंकलास जवान-मर्दा !'

वालम राम लाजला !

बालम रामनें पकडून आणलेल्या त्या पाकिस्तानी गोलंदाजाला कमांडिग ऑफिसरनें पिल बॉक्ससंबंधीं विचारलें, तेव्हां तो म्हणाला, 'इथून वर्कीपर्यंत अन् तिथून इच्छोगिल कालव्या-पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दर तीनशें यार्डांवर अशा प्रकारच्या पिल बॉक्सेस बांधण्यांत आलेल्या आहेत. या पिल बॉक्सेस सिमेंट, कॉंक्रीट अन् पोलाद यांच्यापासून बनविलेल्या आहेत. त्यांच्या भिंती चार फूट जाडीच्या आहेत. वरवर पहाणाऱ्याला

त्या कच्च्या मातीपासून बनविलेल्या आहेत असें वाटावें या हेतूनें त्यांची तशीच रचना केली आहे. इतकेंच नव्हे, तर कांहीं पिल बॉक्समध्यें चहाचीं अगर पानतंबाखूचीं दुकानेंहि थाटलीं गेलीं आहेत !'

पिल बॉक्सेस फोडण्याची युक्ति बालम रामनें शोधून काढली होती, त्यामुळें काम सोपें होत होतें; तरीहि समोर संघर्ष उभा होताच.

मेजर जनरल सिब्बल यांच्या आधिपत्याखालीं असलेले भारतीय सैनिक वाटेंतल्या पिल बॉक्सेस फोडीत पुढें पुढें जात होते.

त्या दिवशीं सप्टेंबरची दहावी तारीख होती. ते सैनिक सप्टेंबरच्या सहाव्या तारखेला हेड क्वार्टर्स सोडून आपल्या काम-गिरीवर निघाले होते. खालडा हुडियारा, कालवा, बर्की कलाम, बर्की खुर्द अन् बर्की इथल्या पिल बॉक्सेसचा विध्वंस केल्यावर सैनिकांची ती तुकडी आतां बर्की कसबाच्या जवळ जाऊन पोहों-चली होती. बर्कीवर भारताचा तिरंगी ध्वज फडकविण्याची योजना आंखण्यांत आली होती !

रात्रीं आठ वाजतां कमांडिंग ऑफिसरनें आदेश दिला, 'शीख रेजिमेंट, अटॅक ऑन बर्की !'

'वाहे गुरु दी फतह !' च्या घोषणांनीं रिकाम्या झालेल्या बर्कीतील घरांच्या भिंती थरथरां कांपूं लागल्या.

शत्रूच्या पिल बॉक्सेसमधून दर मिनिटाला अडीच हजार गोळ्या बाहेर पडूं लागल्या.

'लान्स नाईक गुरुनाम सिंह, शत्रूच्या एकूण एक पिल बॉक्सेस उध्वस्त करून टाक !' कमांडिंग ऑफिसरनें फर्माविलें.

'यस सर!' असें म्हणून गुरुनाम सिंह रांगत रांगत तिथून निघाला नि शत्रूकडील गोळ्यांचा मारा चुकवीत तो एक पिल बॉक्सपाशीं जाऊन पोहोंचल्यावर त्यानें तीन गोळे आंत फेकले.

थोड्याच वेळांत आंतला गोलंदाज बाहेर पळून जाण्याचा प्रयत्न करीत असल्याचें त्यानें पाहिलें, त्याबरोबर त्यानें धांवत जाऊन त्या गोलंदाजाला पकडलें अन् आपल्या पटक्यानें बांधून टाकलें!

'व्हेरी गुड!' कमांडिग ऑफ़िसरनें लान्स नाइकाला शाबासकी दिली.

त्या कैद्यासह भारतीय सैनिक एका दमांत तीनशें यार्ड पुढें गेले. पिल बॉक्स दिसतांच युद्ध होई, ती पिल बॉक्स उध्वस्त केली जाई अन् त्यानंतर भारतीय सैनिक पुढें चालूं लागत!

'ही बर्की आहे.' ज्या मैलाच्या दगडावर "बर्की ०, लाहोर १५" असें उर्दू लिपींत लिहिलें होतें, त्या दगडावर पाय ठेवून कमांडिग ऑफिसर म्हणाला, 'बस्! हातीं घेतलेलें काम जर पुरें केलें, तर मजेंत डिनर घेतां येईल!'

रात्रीचे आठ वाजले होते. भारतीय सैनिकांच्या निरनिराळ्या रेजिमेंटस् निरनिराळ्या मार्गांनीं बर्कीमध्यें घुसल्या अन् मुकाबला करतां करतां पुढें चालूं लागल्या!

पोलीस ठाणीं, घरें, शाळा, मशिदी, जिथून जिथून छुपे हल्ले करतां येण्यासारखे होते, तितके शत्रुसैनिकांनीं केले; पण त्यांनीं थोड्याच वेळांत आपलीं शस्त्रें खालीं ठेवलीं!

बर्कींतले सगळे लोक अगोदरच पळून गेले होते. तिथें शुकशुकाटाशिवाय दुसरें कांहींच नव्हतें. ना दुकान ना मंडई!

अस्तमान होईपर्यंत भारतीय सैनिकांच्या गस्ती तुकड्या बर्कीच्या गल्लोगल्लीं फिरत होत्या; पण तिथें होतेंच कोण मुळीं ? सारी बर्की ओस पडली होती. शोधतां शोधतां त्यांना एक म्हातारा आंधळा माणूस सांपडला.

बर्की भारत सरकारच्या कबजांत असल्याचें जेव्हां त्या म्हाताऱ्या आंधळ्याला कळलें, तेव्हां तो कळकळून सैनिकांना सांगू लागला, 'माझें नांव नबी बख्श असें असून माझें वय अंदाजें ऐंशीं वर्षांचें असेल. माझा जन्म इथेंच झाला अन् इथेंच माझें विड्यातंबाखूचें दुकान होतें. पाकिस्तानी सैनिकांनीं जेव्हां बर्की खालीं केली, तेव्हां त्यांनीं माझें दुकानहि लुटलें ! त्यांना माझी जरासुद्धां दया आली नाहीं. त्यांनीं मला मरायला इथें ठेवलें अन् ते इथून निघून गेले. जातांना त्यांनीं मला गोळी घालून ठार केलें असतें, तर मी या यातनांतून सुटलों असतों !'

तहान अन् भूक यांच्यामुळें तडफडत असलेल्या त्या म्हाताऱ्या आंधळ्या माणसाला भारतीय सैनिकांनीं गरम गरम चहा प्यायला दिला, गरम गरम चपात्या खायला दिल्या अन् ते पुढच्या कामगिरीवर निघून गेले !

✦ ✦

# ९. कर्नल तारापोर

कमांडिंग ऑफिसरच्या मेजावर एक भलामोठा औरस-चौरस नकाशा पसरलेला होता. समोरून कर्नल तारापोर अन् त्यांचे इतर सहकारी त्या नकाशाचें निरीक्षण करीत होते.

सियालकोट विभागाच्या त्या विशालकाय नकाशावरून रूळ फिरवितां फिरवितां कमांडिंग ऑफिसर कर्नल तारापोर यांना म्हणाला, 'कर्नल, हा पहा फिल्लोरा. काल रात्रींपासून आतांपर्यंत मला जी हकीकत कळली आहे, तिच्यावरून या सियालकोट विभागांत शत्रूचे जवळ जवळ तीनशें टॅक्स असून त्यांतून अधिक नसले, तरी या फिल्लोरा विभागांत किमान सत्तर ऐंशी तरी खात्रीनें असले पाहिजेत. फिल्लोराचें सामरिक महत्त्व शत्रूलाहि पुरतें माहीत आहे.'

'यस सर!' कर्नलनीं आपली मान्यता दर्शविली.

'शत्रूचे सारे टॅंक्स नष्ट करण्याची अन् फिल्लोरावर कबजा करण्याची जबाबदारी आपल्यावर आली आहे कर्नल!

आपण विजयी व्हाल अशी मी आशा करतों. या बाबतींत आपल्याला अधिक कांहीं सांगायचें असेल तर सांगा मला.'

निष्कारण वेळ दवडण्यांत अर्थ नाहीं असें कर्नलनां वाटलें; त्यामुळें ते कमांडिंग ऑफिसरला म्हणाले, 'मला सारें माहीत आहे सर! आपण आज्ञा देत असाल तर मी आत्तांच माझ्या कामगिरीवर निघतों.'

'ठीक आहे.' कमांडिंग ऑफिसर म्हणाला, 'माझ्या मतें आम्हांला जितका उशीर होईल, तितका शत्रु जास्त बलवान होईल; त्यासाठीं आपण आत्तांच आपल्या कामगिरीवर निघा.'

भारतीय सैनिकांची ती तुकडी वजीरवालीजवळ पोहोंचतांच तिच्यावर शत्रूनें अचानक आक्रमण केलें.

कर्नल तारापोर अन् त्यांच्यासोबतचे सैनिक वाटेल त्या परिस्थितीशीं झगडायला तयारच होते; त्यामुळें अचानक आक्रमण झाल्याबद्दल त्यांना कांहींच वाटलें नाहीं. कर्नल तारापोर यांच्या आदेशानुसार भारतीय सैनिकांची एक तुकडी हल्लेखोरांवर तुटून पडली. समोरून येत असलेल्या शत्रूच्या गोळ्यांना त्यांनीं दाद दिली नाहीं. वजीरवालीच्या तोफा अन् टँक्स यांचीं तोंडें बंद पडलीं.

कर्नल तारापोर यांना आपल्या सैनिकांसह पुढें जायचें होतें. शत्रूचे सत्तर ऐंशी टँक्स फिल्लोरा भागांत उभे असल्याचें त्यांना पूर्वींच कळलें होतें. त्यांतला एकहि टँक परत मागें जाऊं न देण्याची त्यांनीं योजना आंखली. शत्रु पळून जाऊं लागला, तरी त्याला पळून जातां येऊं नये अशीच ती योजना होती.

वजीरवाली विभागांत शत्रूचे कांहीं टँक्स उध्वस्त करण्यांत आले होते. त्या युद्धक्षेत्रांत शेंकडों मुडदे असहाय अवस्थेंत पडले

होते. त्यांना उचलणारा किंवा त्यांचें दफन करणारा तिथें कुणीच नव्हता. केवळ कांहीं गिधाडें आकाशांत घिरट्या घालीत होतीं तेवढींच ! पण तोफांचे आवाज झाल्यावर तींसुद्धां पळून जात असत.

कर्नल तारापोर यांनीं तिथें आपल्या सोबतच्या सैनिकांची दोन भागांत विभागणी केली अन् तिथून कांहीसे पुढें गेल्यावर पुन्हां त्या दोन तुकड्यांची चार तुकड्यांत विभागणी केल्यावर त्यांनीं फिल्लोरावर चारी बाजूंनीं हल्ला चढविला.

भारतीय सैनिक आपल्यावर चारी बाजूंनीं हल्ला करतील अशी शत्रुसैनिकांची कल्पनाच नव्हती. शत्रूचे सारे सैनिक एकत्र होते; पण चौफेर हल्ल्यामुळें त्यांची लगेच पांगापांग झाली.

कर्नल तारापोर यांनीं ती सोन्यासारखी संधि सोडली नाहीं. त्यांनीं लगेच आपल्या सोबतच्या सैनिकांस आदेश दिला, ' अटॅक ! '

तेवढ्यावरच ते थांबले नाहींत, तर ते स्वतःच एका टॅंकचें संचालन करूं लागले.

त्यांचा आदेश मिळतांक्षणींच भारतीय सैनिक शत्रूच्या पॅटन टॅंक्सवर तोफा डागूं लागले.

भारतीय सैनिकांच्या तोफेंतून सुटलेला गोळा शत्रूच्या टॅंकवर आदळला कीं तो टॅंक धाडधाड पेटत असे.

स्वतः कर्नल तारापोर यांनीं अशा प्रकारें स्वतःच्या हातानें शत्रूचे सात टॅंक्स उध्वस्त करून टाकले.

पण त्यानंतर शत्रूच्या पॅटन टॅंकमधून सुटलेला एक गोळा नेमका कर्नल तारापोर यांच्या टॅंकवर येऊन आदळतांच तो टॅंक जळूं लागला.

आपला टँक जळूं लागल्याचें पहातांच त्यांनीं तो तिथें तसाच सोडून दिला अन् ते दुसऱ्या टँककडे जाऊं लागले. ते पांच सहा पावलें चालून गेले नसतील, तोंच समोरून आलेला एक बाँब त्यांच्यापाशीं येऊन फुटला अन् त्याचा एक भलामोठा तुकडा त्यांच्या अंगांत घुसला.



त्यांच्या अंगांतून रक्ताचे फवारे जोरानें उडूं लागले; तथापि त्यांच्याकडून त्याच्याहिपेक्षां जास्त वेगानें सैनिकांना आदेश सुटूं लागले !

तितक्यांत एक सैनिक त्यांच्यापाशीं आला अन् त्यांना म्हणाला, 'सर, आपण आड व्हा जरा. मी आपल्याला ॲम्ब्युलन्सपर्यंत पोहोंचवितों नेऊन.'

'नको, मला ॲम्ब्युलन्स नको, मला फिल्लोरा पाहिजे !' कर्नल म्हणाले, 'फिल्लोरा जिंकल्यावर मी हॉस्पिटलचा विचार करीन !' ते एखाद्या घायाळ झालेल्या सिंहासारखे गरजले.

तो सैनिक आश्चर्यचकित होऊन मागें परतला अन् आपल्या अधिकाऱ्याचें तें धाडस पाहून दुप्पट अवसानानें लढूं लागला.

कांहीं तासांतच शत्रूचे पाय तिथून उखडले गेले! शत्रु फिल्लोरा सोडून पळून गेला. शत्रुसैनिक पळून गेल्यावर भारतीय सैनिक फिल्लोरांत शिरले अन् अल्पावधींतच त्यांनीं फिल्लोरावर आपला कबजा केला.

'सर, फिल्लोरावर आम्हीं कबजा केला आहे.' कर्नल तारापोर यांनीं वायरलेसवरून कमांडिंग ऑफिसरला कळविलें अन् ते पुढे म्हणाले, 'पण मला जरासें खरचटलें आहे.'

'जरासें खरचटलें आहे?' कमांडिंग ऑफिसर म्हणाला, 'आपल्याला फार मोठी जखम झाल्याचें मला कळलें आहे. आपण हॉस्पिटलमध्यें दाखल व्हावें असें माझें सांगणें आहे आपणाला. आपली आतांपर्यंची कामगिरी माझ्या मतें फारच उत्तम आहे!'

'पण सर, इथून थोड्याशा अंतरावर शत्रूचे कांहीं सैनिक आहेत. आपण जर त्यांना पिटाळून लावलें नाहीं, तर ते आमच्या-वर आक्रमण करतील. त्यांचे सदुसष्ट टँक्स इथें उध्वस्त होऊन पडले आहेत. त्याचा बदला घेण्यासाठीं ते जिवावर उदार होऊन आमच्याशीं लढल्याशिवाय रहाणार नाहींत. मी जसौरा अन् बटूर डोंगराईहून त्यांना पिटाळून लावीन अशी माझी खात्री आहे.'

'शत्रूचें राहूं द्या बाजूला; पण आपण आपलें स्वत:चें पहा ना जरासें!'

'पाहिलें सर; पण त्या बाबतींत विचार करीत बसण्याइतका वेळ नाहीं !'

'ओ. के. !' कमांडिग ऑफिसर म्हणाला, 'विश यू गुड लक !'

फिल्लोरावर पूर्णाधिकार प्रस्थापित केल्यानंतर तो घायाळ झालेला सिंह पुढच्या कामगिरीवर निघून गेला. वाटेंत अनेक अडथळे आले. शत्रूनें पळतां पळतां कुठें रस्ते उध्वस्त केले होते, तर कुठें पूल उडवून दिले होते.

पुन्या तीन दिवसांनंतर ते जसौरा येथें जाऊन पोहोंचले. त्यांच्या स्वागतासाठीं शत्रूनें टँक्स नि तोफा यांचा ताफा तयार ठेवला होता. दोन्ही पक्षांत युद्ध सुरू झालें. त्या युद्धाच्या वेळीं कर्नल तारापोर यांच्या टँकवर शत्रूकडील एक गोळा येऊन आदळला. त्यांनीं तो टँक सोडला नि ते दुसऱ्या टँककडे गेले; पण तितक्यांत शत्रूकडील मशिनगनमधून सुटलेल्या अनेक गोळ्या त्यांच्या छातींत घुसल्या.

त्यांची पर्वा न करतां ते आपल्या सैनिकांस म्हणाले, 'जवानांनो, पुढें चला ! अखेर विजय तुमचाच आहे !'

असें म्हणून ते खालीं पडले नि रांगत रांगत पुढें गेले. त्यांच्या अंगांत रायफल चालविण्याची आतां ताकदच उरली नव्हती.

एका सैनिकानें त्यांना उचललें नि जीपमध्यें ठेवलें. त्यांच्या अंगांतून भळभळां रक्त वहात होतें; पण तशाहि स्थितींत त्यांनीं

त्याला विचारलें, ' जसोरा आपण जिंकला का ?'

' यस सर ! ' सैनिकानें सांगितलें.

' तर मग चला बटूर डोंगराईला ! '

अन् तिथें विजय मिळविल्यावर ते वीरगतीला गेले ! केवळ विजय पहाण्यासाठींच त्यांनीं यमाला थोपवून धरलें होतें ! !

✦ ✦

## १०. मेजर आशाराम त्यागी

त्या काळयाकभिन्न रात्रीं डोगराई गांव थरथरां कांपत होतें. युद्ध जणु निकरावर आलें होतें. आज जें होईल, तसें पूर्वीं कधींच झालें नव्हतें अन् पुढेंहि कधीं होणार नाहीं असें वाटत होतें !

त्या गंभीर वातावरणांत कर्नलसाहेबांचे स्वर घुमत होते, ' अटॅक ! एंड अटॅक ! '

अन् त्याच वेळीं भयंकर स्फोटांमुळें भूकंपाचा भास होत होता. खरोखर ती रात्र फारच भयानक होती.

एकवीस सप्टेंबर एकोणीसशें पासष्ट सालची गोष्ट आहे ही. ती रात्र भारत-पाक युद्धाची अखेरची रात्र म्हणूनहि ओळखली जाते !

डोगराई हें गांव अमृतसर नि इच्छोगिल कालवा यांच्या दरम्यान ग्रँड ट्रंक रोडवर वसलेलें आहे. तिथें शत्रूनें पिल बॉक्सेस, बंकर्स अन् खोल खंदक यांच्याद्वारें मजबूत मोर्चा बनविला होता.

शत्रूला जिंकण्यासाठीं भारतीय सैनिकांची एक सुसज्जित रेजिमेंट कर्नल हाइड यांच्या आधिपत्याखालीं तिथें पाठविण्यांत आली होती. त्या रेजिमेंटमध्यें निवडक सैनिकांखेरीज मेजर आशाराम त्यागींसारखे ऑफिसर्सहि होते.

युद्ध म्हटलें कीं केवळ शस्त्रास्त्रांचा भरपूर सांठा अन् वारा रेडयांचें मानवी बळ असून भागत नाहीं. या दोन गोष्टींची आवश्यकता तर असतेच; पण त्याशिवाय 'तैलबुद्धी' चीहि जरूर असते. आतांपर्यंतचीं वरींचशीं युद्धें या बुद्धिबळावरच जिंकलीं गेलीं आहेत. त्यासाठीं धैर्य नि धाडस या गुणांची अत्यावश्यकता असते !

युद्धाची धुमश्चक्री चालू होती. शत्रूची तयारीहि जबरदस्तच होती ! किती सैनिक, किती मशिनगन्स अन् किती टॅंक्स होते तें कळायला कांहींच आधार नव्हता.

तितक्यांत कर्नल हाइड यांनीं आदेश दिला, 'मिस्टर सिंह, आपण इथेंच शत्रूला थोपवून धरा. मी दुसरीकडचें पहातों.'

कर्नल हाइड तिथून निघाले अन् त्यांनीं आपल्या हाताखालच्या सैनिकांस सांगितलें, 'जवानांनो, आतां तुमच्या परीक्षेची वेळ आली आहे. कद चित तुम्हाला इथें मरावेंहि लागेल; पण तुम्ही लक्षांत ठेवा कीं अखेर तुमचा जय होईल नि तुम्ही मरूनहि अमर व्हाल !'

साऱ्या सैनिकांनीं आपल्या बुटांच्या टांचा जमिनीवर आदळून आपण मरणाला तयार असल्याची ग्वाही दिली !

'तुम्ही डावीकडून जायचें अन् ज्या घरांतून आमच्यावर गोळयांचा मारा होतो आहे, त्या घरांत घुसायचें. तिथपर्यंत

जातांना कितीहि अडथळे आले, तरी तुम्ही त्यांची पर्वा करूं नका !'

कर्नल हाइड यांचा आदेश मिळतांक्षणींच सैनिकांची ती तुकडी पुढें सरसावली अन् गोळ्यांच्या वर्षावाची तमा न बाळगतां त्या घरापाशीं जाऊन पोहोंचली.

तिथें पोहोंचल्यावर भारतीय सैनिकांनीं बाहेरूनच त्या घरांत सामूहिक स्वरूपांत हातगोळे फेकले. आंत असलेले कित्येक सैनिक ठार झाले अन् जे कांहीं जिवंत राहिले होते, त्यांना भारतीय सैनिकांनीं संगिनींच्याद्वारें अल्लाच्या डेऱ्यांत पाठवून दिलें !

' कर्नल त्यागी !'

' यस सर !'

' समोरचे बंकर्स नि पिल बॉक्सेस उध्वस्त करा अन् त्यांच्यामागें असलेले दोन्ही टँक्स हस्तगत करा !'

' यस सर !'

' तर मग व्हा पुढें ! विशेष विचार करीत बसण्याइतका वेळ नाहीं आपल्यापाशीं. पुढें चला नि शत्रूचा धुव्वा उडवा !'

' यस सर !' असें म्हणून मेजर त्यागी तिथून निघून गेले. त्यांच्यासोबत फक्त तीनच सैनिक होते.

' सुभेदार लालचंद !' तो मेजर त्यागींचा आवाज होता. ' तूं तो बंकर उध्वस्त कर अन् सुभेदार पालेराम, त्या पिल बॉक्समध्यं तूं बॉम्ब फेक. अन् तूं हवालदार हनीफ, माझ्यासोबत ये !'

एकाच वेळीं बंकर नि पिल बॉक्स यांची राखरांगोळी झाली.

समोर टँक्स होते. मेजर त्यागींनीं गोळा फेकतांक्षणींच आंतला गोलंदाज ठार झाला.

पण तितक्यांत दुसऱ्या टँकमधल्या गोलंदाजाकडून जी गोळी सुटली, तिनें मेजर त्यागींना मरणांतक घायाळ केलें होतें! त्या अवस्थेंत असतांनाच त्यांनीं त्या पळपुटच्या पाकड्या गोलंदाजाला पळतांना पाहिलें मात्र, लगेच त्यांनीं त्याच्यावर गोळी झाडून त्याला ठार केलें.

त्यानतर हनीफ हवालदारानें मेजर त्यागींना ते बेशुद्धावस्थेत असतांनाच आपल्या पाठुंगळीवर घेतलें अन् कर्नल हाइडपाशीं आणलें.

त्या दरम्यान दोघे भारतीय सैनिक शत्रूच्या दोन रणगाड्यांवर स्वार झाले होते.

'मेजर त्यागी जखमी झाले आहेत सर!' हनीफ हवालदार कर्नल हाइडनां म्हणाला.

कर्नल हाइड पुढें कांहींतरी बोलणार होते; पण त्यापूर्वींच मेजर त्यागी त्यांना म्हणाले, 'सर, मी माझी कामगिरी पुरी केली आहे. बंकर नि पिल बॉक्स हीं उध्वस्त केलीं आहेत. दोन्ही टँक्सहि आपल्या कबजांत आले आहेत. सर, आतां आपण माझें एक काम करा.'

'बोला, कसलें काम करूं?' कर्नल हाइडनीं विचारलें.

'सर, माझ्या दोन इच्छा होत्या; त्यांपैकीं डोंगराईवर विजय मिळविणें ही माझी एक इच्छा आज पुरी झाली. दुसरी सर, कदाचित मी मेलोंच तर माझें शव माझ्या गांवीं पोहोंचतें करण्यांत यावें! बस्स! मी जातों आतां!' असें म्हणून मेजर त्यागींनीं प्राणत्याग केला!

अजूनहि लढाई चालूच असली, तरी शत्रूचें कंबरडें मोडलें जात होतें! त्याचे बंकर्स, टँक्स, पिल बॉक्सेस, हीं बहुतेक उध्वस्त झालीं होतीं किंवा भारतीय सैनिकांच्या कबजांत आलीं होतीं!

सहा तासांनंतर त्या रणभूमीवर शुकशुकाट दिसूं लागला!

कर्नल हाइडनीं वायरलेसवरून हेड क्वार्टरला कळविलें, 'सर, आम्ही बराच मोबदला देऊन डोंगराई सर केली आहे! मेजर आशाराम त्यागी यांना आम्ही गमावून बसलों!'

'अरेरे!' कमांडिंग ऑफिसरनें हळहळ प्रकट केली.

'सर, देहत्यागापूर्वीं मेजर त्यागी यांनीं आपली अंतिम इच्छा प्रकट केली आहे कीं, मरणोत्तर आपलें शव फत्तेपूर जिल्ह्यांतल्या मेरठ गांवीं पाठविण्यांत यावें, म्हणजे त्यांच्या नव-विवाहित पत्नीला आपल्या पतीचें नि वृद्ध पित्याला आपल्या पुत्राचें अंत्यदर्शन घडेल!'

'ठीक आहे!' कमांडिंग ऑफिसरनें सांगितलें, 'मेजरचें शव इकडे पाठवून द्या, म्हणजे तें त्यांच्या गांवीं पाठविण्याची व्यवस्था मला करतां येईल!'

'थँक यू सर!' कर्नल हाइड म्हणाले, 'आतां इच्छोगिल कालव्यापर्यंत आमचा मार्ग मोकळा झाला आहे. आम्ही अल्पावधींतच तिथें दाखल होऊं!'

समाप्त

३१।१०६
९६५६२
ग्रं.वा

IRBK-0116562

IRBK-0116562